दैनिक
# लोकविजय
संस्थापक : कै. पां. ग. रांजणीकर


## अनिकेत तटकरे हे सरोगसी बाळ, आम्ही फॉर्म काढला नसता तर त्यांचा राजकीय जन्म झालाच नसता, शिंदेंच्या आमदाराचा हल्लाबोल

मुंबई दि.२७ (प्रतिनिधी)- गेल्या अनेक दिवसापासून रायगड जिल्ह्यात महायुतीत सातत्याने कुरबुर होत असल्याचं समोर आलं आहे. राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेना या दोन्ही पक्षाचे नेते ऐकमेकांवर आरोप प्रत्यारोप करताना दिसत आहेत. अशातच आज शिवसेना शिंदे गटाचे आमदार महेंद्र दळवी यांनी राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे विधानपरिषदेचे आमदार अनिकेत तटकरे यांच्यावर जहरी टीका केली आहे. अनिकेत तटकरे यांचा त्यांनी सरोगसी बाळ म्हणून उल्लेख आहे. विधानपरिषदेला आम्ही फॉर्म काढला नसता तर लढाई होऊन आम्ही जिंकलो असतो. अनिकेत तटकरेंचा राजकीय जन्म झालाच नसता अशा शब्दात दळवींनी अनिकेत तटकरेंवर टीका केली.

आमदार महेंद्र दळवी यांच्या या जहरी टिकेनंतर रायगडमध्ये शिंदेसेना आणि राष्ट्रवादीमध्ये पुन्हा राजकीय वाद पेटण्याची चिन्हे दिसत आहेत. काल कर्जतमध्ये अनिकेत तटकरे यांनी आमदार महेंद्र दळवी यांच्यावर टीका केली होती. त्यानंतर आज त्या टीकेला दळवींनी जोरदार प्रत्युत्तर दिलं आहे.


(वर्ष ६५ वे अंक २१७) पोस्टाचा परवाना नं./अे/आर/ए.जी.डी-०७/२०२५ छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) शुक्रवार, दि.२८ ऑगस्ट २०२६ (पाने ४) (किंमत २ रूपये)


# नेपाळमधील महाप्रलयात ८ जिल्ह्यात २८९ मृतदेह सापडले

### तब्बल २८८ भारतीय बेपत्ता; तिबेटमध्येही २०० जण अडकले; १५०० जणांचा थांगपत्ता लागेना

काठमांडू दि.२७ (वृत्तसंस्था)- बुधवारी सकाळी नेपाळ-तिबेट सीमेवर अचानक आलेल्या पुराच्या तडाख्यानंतर आतापर्यंत २८९ मृतदेह सापडले आहेत. सुमारे १५०० लोक अजूनही बेपत्ता आहेत. बेपत्ता झालेल्यांमध्ये नेपाळी नागरिकांसोबतच मोठ्या संख्येने परदेशी नागरिकांचाही समावेश आहे. नेपाळमध्ये लष्कर, पोलीस आणि सशस्त्र पोलीस पथके बेपत्ता झालेल्यांचा सतत शोध घेत आहेत. पूरग्रस्त भागात अडकलेल्या लोकांना हेलिकॉप्टर आणि इतर साधनांनी बाहेर काढले जात आहे. भारतीय परराष्ट्र मंत्रालयाच्या माहितीनुसार, नेपाळमधील २८८ भारतीय नागरिकांशी अजूनही संपर्क झालेला नाही. यापैकी ७३ जण त्रिशुली-१ वीज प्रकल्पात काम करतात. पुरात अडकलेल्या २१ भारतीयांना सुखरूप बाहेर काढण्यात आले असून, त्यापैकी ११ जणांची ओळख पटली आहे.

नेपाळ-चीन सीमेजवळ भूकंपाचे जोरदार धक्के जाणवले. यूएस जिओलॉजिकल सर्व्हेने सुरुवातीला हा ४.४ तीव्रतेचा भूकंप असल्याचे सांगितले. पण नंतर असे आढळून आले की, बर्फ आणि खडकांसह पर्वताचा एक मोठा भाग ल्हेंडे खोला नदीत कोसळला होता. ल्हेंडे खोला ही भोटेकोशी नदीची उपनदी आहे, जी चीनमध्ये उगम पावते आणि नेपाळमध्ये प्रवेश करते. यूएसजीएसने नंतर स्पष्ट केले की, ५.२ तीव्रतेचा हा भूकंप भूस्खलनामुळे झाला होता.

नेपाळमधील रसुवाजवळ त्रिशुली नदीला आलेल्या महापुरानंतर, आतापर्यंत ८ जिल्ह्यांतून २८९ मृतदेह बाहेर काढण्यात आले आहेत. ही आकडेवारी दुपारी ३ वाजेपर्यंतची आहे. चितवनमध्ये सर्वाधिक १२१ मृतदेह सापडले आहेत. त्याखालोखाल पूर्व नवलपरासी (६५), धादिंग आणि गोरखा (प्रत्येकी २९), तनहुन (१६), नुवाकोट (१२), पश्चिम नवलपरासी (१४) आणि रसुवा (३) यांचा क्रमांक लागतो.

पुरामुळे खराब झालेले रस्ते आणि पूल दुरुस्त करण्यासाठी भारत नेपाळला बेली ब्रिज पाठवणार आहे. परराष्ट्र मंत्रालयाच्या माहितीनुसार, हा एक पोर्टेबल आणि पूर्वनिर्मित पूल आहे, जो आवश्यक ठिकाणी त्वरित उभारला जाऊ शकतो. जेव्हा पूर किंवा भूस्खलनामुळे



पूल उद्ध्वस्त होतो, तेव्हा बेली ब्रिज रस्त्यांची जोडणी त्वरित पूर्ववत करण्यास मदत करतो. गरजेनुसार तो हलवून पुन्हा स्थापितही केला जाऊ शकतो.

पुराच्या पार्श्वभूमीवर नेपाळच्या त्रिशुली प्रदेशात मदत आणि बचाव कार्य तीव्र झाले आहे. खराब झालेले रस्ते आणि इतर मार्गांमुळे अडकलेल्या लोकांना हेलिकॉप्टरद्वारे बाहेर काढले जात आहे. बचावलेल्या लोकांना हेलिकॉप्टरद्वारे त्रिशुली बाजारात नेले जात आहे. लष्करी आणि खाजगी हेलिकॉप्टरच्या मदतीने आतापर्यंत १०० हून अधिक लोकांना पूरग्रस्त भागातून बाहेर काढण्यात आले आहे.

नेपाळचे परराष्ट्र मंत्री शिशिर खनाल यांनी भारता संदर्भात (पान ४ वर)

# एमपीएससी पेपरफुटी प्रकरणाची व्याप्ती वाढण्याची शक्यता

### गुन्हे शाखेच्या तपासात धक्कादायक माहिती उघड

मुंबई दि.२७ (प्रतिनिधी)- महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या औषध निरीक्षक पद भरती परीक्षा पेपरफुटी प्रकरणात धक्कादायक आणि चक्रावून टाकणारे खुलासे होत आहेत. अशातच या पेपरफुटी प्रकरणाची व्याप्ती अधिक वाढण्याची शक्यता आहे. २२ मार्चला झालेल्या परीक्षेच्या २-३ दिवस आधीच पेपरफुटल्याचे गुन्हे शाखेच्या तपासात निष्पन्न झालं आहे. तर २२ जुलैला जाहीर झालेल्या ४८८ जणांच्या अंतरिम गुणवत्ता यादीत बहुतांश विद्यार्थ्यांना २०० पैकी १२० पर्यंतच मजल मारता आली आहे. तर १२० पेक्षा अधिक गुण मिळवून वरचा क्रमांक मिळवणारे असेही काही विद्यार्थी आहेत ज्यांची अगदी काही महिन्यांपूर्वी झालेल्या इतर स्पर्धा परीक्षांमधील कामगिरी सामान्य होती आणि त्यांचा क्रमांकही हजारांमध्ये होता. त्यामुळे हे सगळे परिक्षार्थी सध्या संशयाच्या घेऱ्यात आहेत.

दरम्यान, याप्रकरणी कौटिल्य अकॅडमीचा संचालक प्रवीण पाटील याला देखील अटक करण्यात आल्याने त्याने त्याच्या संपर्कातील अनेक परीक्षार्थींना प्रश्नांचा संच दिल्याचा संशय आहे. तसेच फुटलेल्या प्रश्नपत्रिका व्हाट्सअपवर व्हायरल झाल्याचा तक्रारदार परीक्षार्थींचा दावा आहे. त्यामुळे केवळ एकाच परीक्षार्थीला प्रश्नपत्रिकेचा संच मिळाल्याच्या आयोगाच्या दाव्यावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. प्रवीण पाटील आणि महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे अटक करण्यात आलेले अवर सचिव अभिजीत लेंडवे, परीक्षेचे समन्वय अधिकारी विश्वेश्वर नकाते आणि सहाय्यक कक्ष अधिकारी गोपाळ मराठे यांच्या बँक खात्यांच्या आर्थिक व्यवहारांची गुन्हे शाखेकडून तपासणी सुरू असून त्यातूनही मोठे खुलासे होण्याची शक्यता आहे.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या औषध निरीक्षकाचा पेपर फुटल्याचे एमपीएससीने मान्य केला असून नवीन परीक्षा घेणार असल्याचे जाहीर केले आहे याप्रकरणी नंदुरबार मधील चौघांना पोलिसांनी अटक केली आहे सर्वात केंद्रबिंदू ठरलेल्या नंदुरबार मधील कौटिल्य अकॅडमीच्या प्रवीण पाटलांना अटक करण्यात आली असून प्रवीण पाटील यांनी अजून कुठल्या विद्यार्थ्यांना हे पेपर दिले आहेत हे पाहणं महत्त्वाचे राहणार आहे.

## सीमांकन विधेयकासाठी संसदेचे विशेष अधिवेशन बोलवणार?; काँग्रेस सतर्क, खरगेंचे पंतप्रधानांना पत्र

नवी दिल्ली दि.२७ (वृत्तसंस्था)- केंद्रीय संसदीय मंत्री किरेन रिजिजू यांनी एका मुलाखतीत सीमांकन विधेयकावरून केलेल्या विधानानंतर देशातील राजकारण तापले आहे. रिजिजू यांचं विधान राज्यसभेचे विरोधी पक्षनेते आणि काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी गांभीर्याने घेतले आहे. खरगे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पत्र लिहून या मुद्द्यावर भूमिका स्पष्ट करण्याची मागणी केली आहे. त्याशिवाय खरगे यांनी सर्वपक्षीय बैठक बोलावण्याचीही मागणी पंतप्रधान मोदींकडे केली आहे.

मल्लिकार्जुन खरगे यांनी पत्रात म्हटलंय की, २०२९ च्या लोकसभा निवडणुकीपूर्वी महिलांसाठी ३३ टक्के आरक्षण तातडीने लागू करावे. त्याशिवाय लोकसभेतील सध्याच्या ५४३ जागांची संख्या आणि राज्यांच्या आधारावर जागांचे वाटप पुढील २५ वर्षांसाठी फ्रीज करण्यात यावे. सरकार सीमांकन विधेयकाबाबत जो काही प्रस्ताव आणत असेल त्यावर चर्चेसाठी सर्व राजकीय पक्षांची आणि राज्य सरकारांची एक बैठक बोलवावी. प्रस्तावित विधेयक संसदेत आणण्यापूर्वी सर्व विरोधी पक्षांना त्यावर अभ्यास करण्यासाठी पुरेसा वेळ दिला (पान ४ वर)

## जुजबी मराठी शिकण्यासाठी अमराठी रिक्षा आणि टॅक्सी चालकांना एक वर्षाची मुदत; देवेंद्र फडणवीस यांची घोषणा

मुंबई दि.२७ (प्रतिनिधी)- मुंबईसह राज्यभरातील अमराठी रिक्षा आणि टॅक्सी चालकांना देवेंद्र फडणवीस सरकारने मोठा दिलासा दिला आहे. या सगळ्यांना जुजबी मराठी शिकण्याठी सरकारने एक वर्षाची मुदत दिली आहे. या वर्षभरात कुठलीही कारवाई केली जाणार नाही असं आश्वासन देवेंद्र फडणवीस यांनी दिलं आहे. मराठी शिकण्यासाठी आम्हाला वेळ वाढवून द्या अशी मागणी करत रिक्षा आणि टॅक्सी चालक संघटनांचे प्रतिनिधी देवेंद्र फडणवीस यांना भेटले होते. त्यांच्या भेटीनंतर जी चर्चा झाली त्यानंतर देवेंद्र फडणवीस यांनी माध्यमांशी बोलताना हा निर्णय जाहीर केला.

अमराठी टॅक्सी आणि रिक्षा चालक आहेत त्यांची संघटना आम्हाला भेटली त्यांच्या प्रतिनिधींनी हे सांगितलं की आम्हाला वेळ वाढवून द्या. आम्हाला इतक्या तातडीने मराठी भाषा शिकणं शक्य नाही. त्यामुळे आम्ही असा निर्णय घेतला आहे की मराठी शिकण्यासाठी या रिक्षा आणि टॅक्सी चालकांना एक वर्षाची मुदतवाढ देण्यात येईल. एक वर्षभर या रिक्षा आणि टॅक्सी चालकांवर कुठलीही कारवाई केली जाणार नाही. या एक वर्षाच्या कालावधीत त्यांनी हा निर्णय घेतला आहे की वेगवेगळ्या प्रकारे क्लासेस तयार करुन जुजबी मराठी शिकतील. त्यांना वेळ वाढवून हवा होता. त्यामुळे या रिक्षा आणि टॅक्सी चालकांना मराठी शिकण्यासाठी एक वर्षाची मुदत देण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जो निर्णय घेतला त्याबद्दल मला आनंद आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही हे सांगितलं होतं की मराठी ही प्रेमाची भाषा आहे, ती प्रेमाने शिकली पाहिजे त्याची सक्ती करता कामा नये. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जी घोषणा केली आहे ती चांगलीच आहे. मी फक्त एक आठवण करुन देऊ इच्छितो की १२ ऑगस्टचा जो जीआर आहे त्यात मराठी भाषा शिकण्यासाठी अमराठी रिक्षा आणि टॅक्सी चालकांना एक महिन्याची मुदत देण्यात आली आहे. त्या मुदतीत मराठी न शिकल्यास बॅज आणि परवाना जप्त केला जाईल आणि पुन्हा तीन महिन्यांची मुदत दिली जाईल असं म्हटलं आहे तो जीआर रद्द करावा किंवा सुधारणा करावी ही विनंती करतो आहे असं संजय निरुपम यांनी म्हटलं आहे.

## ओबीसी प्रमाणपत्रावरुन आधी सुप्रिया सुळेंवर केले आरोप; नंतर विजय वडेट्टीवारांचा माफीनामा

मुंबई दि.२७ (प्रतिनिधी)- काँग्रेस नेते, आमदार विजय वडेट्टीवार यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या (शरद पवार) खासदार सुप्रिया सुळे यांच्याकडे ओबीसी प्रमाणपत्र असल्याचा आरोप केला. याप्रकरणी सुप्रिया सुळे यांनी आक्रमक भूमिका घेत वडेट्टीवार यांचे आरोप धादांत खोटे असल्याचे म्हटले. तसेच, आरोप सिद्ध करावा अन्यथा जाहीर माफी मागावी, अशी मागणी केली. यानंतर आता वडेट्टीवार यांनी स्पष्टीकरण देताना सुप्रिया सुळे यांच्या नावाचा अनावधानाने उल्लेख झाल्याचे सांगत खेद व्यक्त केला आहे.

विजय वडेट्टीवारांनी ओबीसी प्रमाणपत्राच्या संदर्भात भूमिका मांडताना खासदार सुप्रिया सुळे यांच्याकडे ओबीसी प्रमाणपत्र असल्याचा आरोप केला. या आरोपानंतर सुप्रिया सुळे आक्रमक झाल्या व त्यांनी वडेट्टीवारांचे आरोप खोटे असल्याचे सांगितले. “विजय वडेट्टीवार यांनी माझ्याकडे ओबीसी प्रमाणपत्र असल्याचा धादांत खोटा आरोप केला आहे. माझ्याकडे ओबीसी प्रमाणपत्र असल्याची माहिती त्यांना नेमकी कोणी आणि कोणत्या आधारावर दिली, हे त्यांनी जाहीर करावे”, असे आव्हान सुळेंनी वडेट्टीवारांना दिले.

सुप्रिया सुळेंनी ‘एक्स’ या सोशल (पान ४ वर)

## जिल्हा परिषद, पंचायत समित्यांमध्येही आता स्वीकृत सदस्य; ग्रामविकास विभागाची अधिसूचना जारी

मुंबई दि.२७ (प्रतिनिधी)- महापालिका आणि नगरपालिकांप्रमाणे आता जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांमध्येही स्वीकृत अर्थात नामनिर्देशित सदस्यांची नियुक्ती करता येणार आहे. ग्रामविकास विभागाने यासंदर्भातील अधिसूचना जारी केल्याने नियुक्तीचा मार्ग मोकळा झाला आहे.

संबंधित पक्षांच्या संख्याबळानुसार या सदस्यांची निवड केली जाणार असून, त्यामुळे स्थानिक पातळीवरील राजकीय कार्यकर्त्यांना संधी मिळणार आहे. राज्यातील जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांमध्ये तब्बल १ हजार ५ नामनिर्देशित सदस्यांची भर पडणार आहे.

‘महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या (दुसरी सुधारणा) विधेयक,२०२६’ यापूर्वीच विधानसभेत मंजूर झाले आहे. त्यानंतर आता ग्रामविकास विभागाने अधिसूचना जारी केल्याने स्वीकृत सदस्यांच्या नियुक्तीची प्रक्रिया सुरू होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे

राज्यातील ३४ जिल्हा परिषदांमध्ये सध्या २ हजार २१० निर्वाचित सदस्य आहेत. आता त्यासोबत २०१ स्वीकृत सदस्यांची नियुक्ती केली जाणार आहे. जिल्हा परिषदेत एकूण निर्वाचित सदस्यसंख्येच्या १० टक्के किंवा किमान ५ सदस्य, यापैकी लागू असलेल्या मर्यादेनुसार नामनिर्देशित सदस्य नियुक्त करण्याची तरतूद करण्यात आली आहे.

त्याचप्रमाणे राज्यातील ३०१ पंचायत समित्यांमधील ४ हजार २४ निर्वाचित सदस्यांच्या संख्येत आता ८०४ नामनिर्देशित सदस्यांची भर पडणार आहे. पंचायत समितीमध्ये एकूण सदस्यसंख्येच्या २० टक्के किंवा किमान १ सदस्य नियुक्त करण्याची तरतूद आहे.

स्वीकृत सदस्य म्हणून केवळ राजकीय कार्यकर्त्यांनाच संधी मिळणार नाही, तर संबंधित क्षेत्रातील अनुभव आणि ज्ञान असलेल्या व्यक्तींनाही प्रतिनिधित्व मिळू शकते. वकील, शिक्षक, प्राध्यापक, समाजसेवक तसेच विविध क्षेत्रातील तज्ज्ञांना या माध्यमातून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कामकाजात सहभागी करून घेण्याचा उद्देश आहे.

## अमित साटमांना भुंकायला ठेवलेय, ते उत्तम काम करतात; अमित ठाकरेंचा नागपुरात हल्लाबोल

नागपूर दि.२७ (प्रतिनिधी)- मनसे नेते अमित ठाकरे यांनी मुंबई भाजप अध्यक्ष अमित साटम यांच्यावर जहरी टीका केली. अमित साटम यांना भुंकायलाच ठेवलंय. ते काम ते उत्तम करत आहेत. तेच त्यांचं काम आहे, असं अमित ठाकरे म्हणाले. ते नागपुरात बोलत होते. महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेचे महाराष्ट्र अध्यक्ष अमित ठाकरे नागपूर दौऱ्यावर आहेत. यावेळी त्यांनी पाचपावली परिसरात सिंधू महाविद्यालयाला भेट दिली. मनसे विद्यार्थी सेनेच्या सदस्यता मोहीम काउंटरला भेट देऊन सदस्यता मोहीम प्रक्रियेची माहिती घेतली. याठिकाणी त्यांनी आधी विद्यार्थ्यांशी संवाद साधला, त्यानंतर पत्रकार परिषदेत विविध विषयावर भाष्य केलं.

यावेळी त्यांना भाजप मुंबई अध्यक्ष अमित साटम यांनी मराठी भाषेवरुन राज ठाकरे यांच्यावर केलेल्या टीकेबद्दल विचारण्यात आलं. राज ठाकरे यांनी आपल्या नातवाला म्हणजेच अमित ठाकरे यांच्या मुलाला बालमोहन विद्यालयात अॅडमिशन घ्यावं आणि मग टीका करावी असं आव्हान अमित साटम यांनी दिलं होतं. त्याला अमित ठाकरे यांनी उत्तर दिलं.

अमित ठाकरे म्हणाले, “अमित साटम यांना भुंकायलाच ठेवलंय. ते काम ते उत्तम करत आहेत. तेच त्यांचं काम आहे. अशा लोकांवर मी काय बोलू. ज्यांना स्वत:च्या भाषेचं, राज्याचं काहीच पडलेलं नाही.अमित साटम म्हणजे तोच (पान ४ वर)

## राज्यात १६ जिल्ह्यांना विजांसह सरींचा इशारा, मध्य महाराष्ट्रासह मराठवाड्यात पावसाचा हवामान विभागाचा अंदाज

मुंबई दि.२७ (प्रतिनिधी)- महाराष्ट्रात गेल्या काही दिवसांपासून मान्सूनचा जोर काहीसा कमी झाला असला, तरी पावसाच्या सरींचे आगमन कायम आहे. राज्यातील अनेक भागांत पावसाने उघडीप दिली असली, तरी काही जिल्ह्यांमध्ये हलका ते मध्यम पाऊस सुरू आहे. दरम्यान, आज, २७ ऑगस्ट रोजी मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यातील काही भागांत विजांच्या कडकडाटासह पावसाची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. राज्याच्या उर्वरित भागांत ढगाळ वातावरण राहण्याची शक्यता असून, काही ठिकाणी हलक्या सरी पडू शकतात.

हवामान विभागाच्या अंदाजानुसार, आज नंदूरबार, धुळे, जळगाव, नाशिक, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर, छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, परभणी, हिंगोली, धाराशिव, लातूर आणि नांदेड या १६ जिल्ह्यांत तुरळक ठिकाणी विजांसह पाऊस पडण्याची शक्यता आहे. त्यामुळे या जिल्ह्यांतील नागरिकांनी विशेषतः दुपारनंतरच्या काळात आकाशातील बदलांकडे लक्ष ठेवण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

सध्या मान्सूनचा आस असलेला कमी दाबाचा पट्टा उत्तरेकडे सरकला आहे. दक्षिण उत्तर प्रदेश आणि लगतच्या मध्य प्रदेशात कमी दाबाचे क्षेत्र सक्रिय आहे. या प्रणालीच्या आसपास समुद्रसपाटीपासून सुमारे ४.५ किलोमीटर उंचीपर्यंत चक्राकार वाऱ्यांची स्थिती निर्माण झाली आहे. मान्सूनचा आस जम्मूपासून डेहराडून, शाहजहानपूर, सक्रिय कमी दाब क्षेत्राचे केंद्र, रांची आणि दिघा मार्गे वायव्य बंगालच्या उपसागरापर्यंत विस्तारलेला आहे. याशिवाय दक्षिण मध्य महाराष्ट्रात समुद्रसपाटीपासून सुमारे ५.८ किलोमीटर उंचीवर चक्राकार वाऱ्यांची स्थिती कायम आहे. या हवामान प्रणालींच्या प्रभावामुळे राज्यात काही भागांत पावसाच्या सरी सुरू राहण्याची शक्यता आहे. मात्र, मान्सूनचा मुख्य आस महाराष्ट्राच्या तुलनेने उत्तरेकडे सरकल्याने राज्यात सध्या सर्वदूर मुसळधार पाऊस होण्याऐवजी तुरळक ठिकाणी हलका ते मध्यम पाऊस आणि काही भागांत मेघगर्जनेसह सरी असे चित्र पाहायला मिळत आहे.

## खाऊन-पिऊन आंदोलन करा; नरहरी झिरवळांचा आंदोलक विद्यार्थ्यांना सल्ला

### १४ दिवसांपासून उपोषण सुरू; लेखी आश्वासनावर विद्यार्थी ठाम

पुणे दि.२७ (प्रतिनिधी)- पुण्यातील मांजरी परिसरात विविध मागण्यांसाठी आदिवासी विद्यार्थ्यांचे आंदोलन आणि उपोषण गेल्या १४ दिवसांपासून सुरू आहे. आपल्या १४ प्रमुख मागण्यांसाठी विद्यार्थी आंदोलन करत असून, काही विद्यार्थी आमरण उपोषणाला बसले आहेत. मागण्या मान्य झाल्याचे लेखी आश्वासन मिळेपर्यंत आंदोलन मागे घेणार नसल्याची भूमिका विद्यार्थ्यांनी घेतली आहे. दरम्यान, आंदोलनस्थळी भेट देताना विधानसभेचे उपाध्यक्ष आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गटाचे नेते नरहरी झिरवळ यांनी केलेल्या वक्तव्याची सध्या चर्चा सुरू आहे.

राज्याचे आदिवासी विकास मंत्री अशोक उईके आणि नरहरी झिरवळ यांनी आंदोलनस्थळी जाऊन विद्यार्थ्यांशी चर्चा केली. यावेळी दोन्ही मंत्र्यांनी विद्यार्थ्यांना आमरण उपोषण सोडण्याची विनंती केली. मात्र, विद्यार्थ्यांनी आपल्या मागण्यांबाबत लेखी शासन निर्णय (जीआर) किंवा ठोस लेखी आश्वासन मिळाल्याशिवाय आंदोलन मागे घेण्यास स्पष्ट नकार दिला.

मंत्री अशोक उईके आणि नरहरी झिरवळ आंदोलनस्थळी विद्यार्थ्यांची भेट घेण्यासाठी आले असताना त्यांच्यात संवाद झाला. यावेळी झिरवळ यांनी विद्यार्थ्यांना ‘खाऊन-पिऊन आंदोलन करा’ असा सल्ला दिल्याचे समोर आले. झिरवळ यांचे हे वक्तव्य ऐकल्यानंतर आंदोलनकर्त्या विद्यार्थ्यांनीही त्यांना प्रत्युत्तर दिले.

‘खाऊन-पिऊन आंदोलन करायचं असतं तर तुम्ही इथे आलेच नसते,’ अशी प्रतिक्रिया विद्यार्थ्यांनी दिली. या संवादामुळे आंदोलनस्थळी काही काळ वातावरण हलकेफुलके झाले. मात्र, झिरवळ यांच्या वक्तव्यावर काही विद्यार्थ्यांनी नाराजी व्यक्त केली.

आदिवासी विद्यार्थ्यांच्या १४ प्रमुख मागण्यांवर तोडगा काढण्यासाठी आदिवासी विकास मंत्री अशोक उईके यांनी विद्यार्थी प्रतिनिधींच्या शिष्टमंडळासोबत तब्बल पाच तास बैठक घेतली. बैठकीनंतर सरकार आणि विद्यार्थ्यांमध्ये सकारात्मक चर्चा झाल्याचे मंत्री उईके यांनी सांगितले. मात्र, काही मागण्यांबाबत तांत्रिक बाबी तपासणे आवश्यक असल्याने निर्णय घेण्यासाठी त्यांनी आणखी दोन दिवसांचा वेळ मागितला.

## खुन्नस द्याल तर मुंबईला येणारच, कोण अडवते ते बघतो!’; मनोज जरांगेंचा सरकारला थेट इशारा

जालना दि.२७ (प्रतिनिधी)- मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी लढा अधिक तीव्र करत मनोज जरांगे पाटील यांनी येत्या २९ ऑगस्ट रोजी अंतरवाली सराटी येथे पुन्हा बेमुदत उपोषणाला बसणार असल्याची अधिकृत घोषणा केली आहे. ’सरकारने मराठ्यांची अडवणूक करण्याचा प्रयत्न केला अथवा जितकी जास्त खुन्नस दिली, तितकाच मराठा समाज पेटून उठून थेट मुंबईत धडकेल. आम्हाला मुंबईत येण्यापासून कोण अडवणार आहे, तेच मी आता बघतो,’ असा थेट आणि आक्रमक इशारा त्यांनी राज्य सरकारला दिला. अंतरवाली सराटी येथे आज गुरुवारी आयोजित पत्रकार परिषदेत ते प्रसारमाध्यमांशी बोलत होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर थेट टीका करताना जरांगे म्हणाले, ’आम्ही २९ तारखेला अंतरवाली सराटीत शांततेत उपोषणाला बसणार आहोत. मात्र, देवेंद्र फडणवीस यांचा मराठ्यांबद्दलचा द्वेष पुन्हा उफाळून आला असून ते मराठ्यांना मराठ्यांच्याच माध्यमातून अडवण्याचा प्रयत्न करत आहेत. एवढा मोठा मुख्यमंत्री असतानाही त्यांना हे समजू नये, ही दुर्दैवाची बाब आहे.’ पुढे बोलताना ते म्हणाले, ’आता मी थेट ’वर्षा’ बंगल्यावरच जाणार आहे. ’वर्षा’ काय कोणाची वैयक्तिक जहागीर आहे का? ती आपल्या सर्वांची आहे. फडणवीस महाराष्ट्राचे मालक आहेत, ते आम्हाला बसा म्हणतील. त्यांच्या दालनात अडचण नको म्हणून मी त्यांच्या खोलीत बसणार नाही, पण ’वर्षा’वर मुक्काम नक्की ठोकेन असे ते म्हणाले. त्यांनी काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांच्याही वक्तव्याचा खरपूस समाचार घेतला.

मुंबई आंदोलनाच्या रणनीतीबाबत बोलताना जरांगे पाटील यांनी (पान ४ वर)

## सोन्याच्या दरात पुन्हा मोठी तेजी

मुंबई दि.२७ (प्रतिनिधी)- गेल्या आठवड्यात यूएस ट्रेझरीने बॉण्ड मार्केटमध्ये केलेल्या अनपेक्षित हस्तक्षेपामुळे सोन्याच्या दरातील तेजीला नवी चालना मिळाली असून, या महिन्यात आतापर्यंत सोन्याच्या दरात १२ टक्क्यांपेक्षा जास्त वाढ झाली आहे. गुरुवारी, वार्षिक जॅक्सन होल बैठकीपूर्वी गुंतवणूकदारांचे लक्ष फेडरल रिझर्व्हच्या व्याजदराच्या दृष्टिकोनाकडे वळल्याने सोन्याचा भाव पुन्हा प्रति औंस ४,६०० डॉलरच्या वर गेला. सोन्याने १.१ टक्क्यांपर्यंतची वाढ नोंदवली आणि मागील सत्रात झालेले बहुतेक नुकसान भरून काढले. (पान ४ वर)

# एक बंधन असे, जे सर्व बंधनातून मुक्त बनविते !

मनुष्याला स्वभावानेच स्वातंत्र्याची सवय आहे. कोणीही व्यक्ती सामान्यपणे स्वत:ला कोणत्याही बंधनात बांधू इच्छित नाही, मग ते बंधन व्यक्तींचे असो, वस्तूंचे असो वा नियम कायद्यांचे असो. मनुष्यच काय पशु-पक्षी सुद्धा बंधनमुक्त राहू इच्छितात. स्वेच्छेने कोणताही पक्ष'ी पिंजऱ्यात राहू इच्छित नाही आणि ना कोणत्याही जनावराला वाटते की खुंटीला बांधून राहावे. कारण की स्वतंत्रता प्रत्येक जीवाची मूळ प्रवृत्ती आहे. तरी सुद्धा आजच्या युगात मनुष्याला तऱ्हेतऱ्हेची बंधने आहेत. ज्यामध्ये तो इच्छा असो-नसो पण बांधलेला आहे. पती-पत्नी, माता-पिता, गुरू-शिष्य, स्वामी-सेवक, राजा-प्रजा हे सर्व नात्यांचे बंधन आहेत. प्रत्येक नात्याच्या निहित मर्यादित व्यक्तीला बांधून राहावे लागते. या व्यतिरिक्त समाजाचे रूढी-परंपरा, लोक-लाज यांचे बंधन काही कमी नाही. ज्यास इच्छा नसूनही त्याला निभावे लागते. कोणाचे शरीर रूग्ण आहे. दुर्बळ आहे, त्यात काही असमर्थता आहे. अशा प्रकारे तो शरीराच्या बंधनात बांधलेला आहे. तसेच सुद्धा प्रत्येक आत्मा जोपर्यंत शरीरात आहे. तोपर्यंत त्याला शरीराच्या कर्मेन्द्रियांच्या बंधनात बांधून राहावे लागते. कोणाचे मन अशांत आणि तणावग्रस्त आहे. शरीर कमकुवत आहे. त्यास मनाचे बंधन आहे आणि सर्वात सुक्ष्म तर विषय विकारांचे बंधन आहे, जे जवळ जवळ प्रत्येक मनुष्याच्या मन आणि शरीर या दोघांना बांधून ठेवते. कधी तो लोभाच्या जाळ्यात फसतो तर कधी मोहाच्या दोरीने बांधला जातो. तर कधी अहंकारामुळे उंच स्थितीवरून खाली येतो. कधी आळस आणि उदासिनता त्याच्या क्षमतांना क्षीण करतात. तर कधी ईर्ष्या आणि व्देष त्याची सुख-शांती-चैन खेचून घेतात. विकारांचे हे बंधन दुसऱ्या कोणत्याही मोठ्या बंधनांहून मोठे आणि कडू आहे. ज्यात अडकून प्रत्येक आत्मा आज तडफडत आहे. म्हणून तर लोक मुक्तीसाठी देवळात जावून प्रार्थना करतात की हे प्रभु या दु:खांच्या बंधनांपासून लवकर मुक्त कर. परंतु वास्तविक कोणत्याही व्यक्तीला या बंधनांपासून सुटण्याचा उपाय माहितच नाहिये. लोकं एकच रट आवश्यक लावतात की हे प्रभु। रक्षण कर, संकट दूर कर सुख-शांती दे. परंतु काय कधी आपण विचार केला की खरी सुरक्षा कशी होईल आणि आपण बंधन मुक्त कसे बनू?

रक्षा बंधन वा राखीचे पावन पर्व आपण अनेक पिढ्यांपासून साजरे करीत आलो आहोत. परंतु केवळ भावाने बहिणीची सुरक्षा करण्याचे पर्व मानूनच लोक हे साजरे करतात आणि विसरून जातात. ज्ञानाचे सागर 'परमात्मा शिव' वर्तमान कलियुगी सृष्टिच्या अंतकाळी ब्रह्माबाबांच्या शरीरात येवून मनुष्य आत्म्यांना विश्व रक्षणाचा मंत्र देत आहेत आणि त्याचबरोबर सर्व बंधनांपासून मुक्त होण्याची युक्ती सुद्धा सांगत आहेत. त्यानुसार राखी पवित्रतेचे एक कडे आहे जे फक्त एका बहिणीव्दारे आपल्या भावाच्या मनगटावर ब ांधल्याने विश्व रक्षण घेणार नाही. परंतु वास्तविक आज सुरक्षाकडे मानवाला बांधायचे आहे. रक्षणाच्या सूत्रात विश्व बंधुत्व, मानव प्रेम, शांती, सद्भावना आणि एकतेचा संदेश दडलेला आहे. म्हणून केवळ परंपरागत पद्धतीने राखीचे पर्व साजरे केल्याने काहीच फायदा नाही, जोपर्यंत आपण याचे आध्यात्मिक मर्म समजून आपण सर्व म ानव जातीची सुरक्षा आणि कल्याणासाठी कार्य करीत नाही. जोपर्यंत प्रत्येक मनुष्य आत्मा विषय विकार व दुर्व्यसनांचा त्याग करीत नाही. पवित्रता आणि प्रेमाच्या सूत्रात बांधावे म्हणजे जगातील दु:ख आणि अडचणींचे सर्व बंधन स्वत: मिटतील वा कमी होतील. सर्वत्र सुख, शांती आणि खुशाली होईल. अशा प्रकारे रक्षाबंधन एक असे बंधन आहे जे सर्व बंधनांपासून मुक्त बनविते.

राजयोग एक सुरक्षा कवच : आपण बघत आहोत की व्यक्ति विकार आणि व्यसनांच्या बंधनातून इच्छा असूनही सुटू शकत नाहीत, तर या बंधनांनी त्यांचे जीवन दु:खमय बनविले आहे. याचे कारण हेच आहे की या वाईटापासून होण्यासाठी किंवा त्यांना सोडण्यासाठी व्यक्तीमध्ये आवश्यक इच्छा शक्ती व मनोबल नाहीये. 'राजयोग' अशी ध्यान करण्याची विधी आहे. ज्याव्दारे आपण सर्व शक्तीवान परमात्माशी बुद्धीयोग जोडून निज मन आणि आत्म्याचे सशक्तीकरण करू शकतो. 'राजयोगाने' प्राप्त दिव्य आत्म्याचे सशक्तीकरण करू शकतो. 'राजयोगाने' प्राप्त दिव्य शक्तीच, खरे सुरक्षा कवच आहे जे व्यक्तीला प्रत्येक वाईट आणि विकर्मांपासून वाचविते आणि बंधनांपासून सुटण्याचे बळ प्रदान करते. तर या 'राजयोगी आणि पवित्र बनून राखी पर्व सार्थ करा व सर्व बंधनांपासून मुक्त बना.

## रक्षाबंधनाचे धार्मिक महत्त्व!

रक्षाबंधन व नारळी पौर्णिमा हे दोन पवित्र सण एकाच दिवशी साजरे करण्यात येतात. प्राचीन व महाभारतकालीन ग्रंथातही या सणाचा संदर्भ सापडतो. देव व असुर यांच्यातील संघर्षात देवांचा जय झाल्यानंतर या सणास सुरूवात झाल्याचेही मानण्यात येते. दंतकथेनुसार देव व असुर यांच्यातील युद्धात देवांची पीछेहाट होत असलेली बघून देवराज इंद्र यांनी युद्धात भाग घेण्याचा निर्णय घेतला. इंद्राची पत्नी इंद्राणीने त्याच्या हातात रक्षाबंधन केले. यामुळे त्यांना युद्धात विजय प्राप्त झाला. पुराणांनुसार श्रावण पौर्णिमेस पुरोहितांनी दिलेले आशीर्वाद पवित्र मानले जातात.

या सणांस धर्मबंधनाचे स्वरूपही आहे. मध्ययुगीन भारतात बाहेरील आक्रमकांपासून महिलांचे सरंक्षण करण्यासाठी हा सण साजरा करण्यात येत होता. तेव्हापासून भावाच्या मनगटावर राखी बांधण्याच्या पवित्र संस्कृतीस सुरूवात झाली. महाराष्ट्रात नारळी पौर्णिमा म्हणून प्रचलित असलेल्या ह्या सणाच्या दिवशी पर्जन्यदेवता वरूण राजाची आराधना करण्यात येते. या पवित्र दिवशी बहीण भावास अक्षता लावून ओवाळते व राखी बांधते. भाऊही आपल्या लाडक्या बहिणीस दागिने, कपडे यासारख्या भेटवस्तू देतात. रक्षाबंधनास सलोनो नावानेही ओळखले जाते. श्रावण पौर्णिमेच्या दिवशी पवित्र नदी किंवा तळ्यात स्नान करून सूर्यदेवास अर्घ्यदान करण्यात येते. गावानजीक नदी नसल्यास विहिरींवरही ही पूजा केली जाते. ब्राह्मण या दिवशी जुन्या जानव्याचा त्याग करून नवीन जानवे धारण करतात. श्रावण महिन्यातील पौर्णिमेस श्रावण नक्षत्र असल्यास त्यास अनुकूल व लाभदायक मानण्यात येते. आश्विनीपासून रेवतीपर्यंत २७ नक्षत्रात श्रावण नक्षत्राचा क्रम बावीसावा आहे. या नक्षत्राचा स्वामी चंद्र आहे. श्रावण महिन्यातील अंतिम तिथीस येर्णाया श्रवण नक्षत्राच्या पौर्णिमेस म्हणूनच श्रावणी म्हणण्यात येते. या दिवशीच रक्षाबंधनाचा सण साजरा करण्यात येतो.

# रक्षाबंधन बहिण- भावांचे पवित्र नाते; या निमित्ताने व्हावे वृक्षारोपण

**रक्षाबंधन** हा सण बहिण-भावाचा सण म्हणून राज्यासह देशात ओळखला जातो.राखीचा धागा साधासुधा नसुन अतुट बंधन आहे.भारतात सर्वच जातीधर्माचे लोक रक्षाबंधन मोठ्या उत्साहाने व आनंदाने साजरा करतात.यात भावाने बहिणीला दिलेले वचन अत्यंत महत्त्वाचे असते. पंचागानुसार श्रावण महिन्यातील म्हणजे राखी पौर्णिमा याला नारळी पौर्णिमा सुध्दा म्हणतात.हा सण भारतीय संस्कृतीच्या सणांमध्ये प्रमुख सण आहे.यामुळे बहिण-भावात उत्साहाचे वातावरण निर्माण होते. भारतात संपूर्ण राज्यात राखी पौर्णिमा वेगवेगळ्या पध्दतीने साजरी केली जाते.उत्तर भारतात कजरी पौर्णिमा,पश्चिम भारतामध्ये'नारळी पौर्णिमा'या नावाने हा सण साजरा केला जातो.पुराणात सांगितल्याप्रमाणे श्रावण पौर्णिमेला मोठ्यांचे आशीर्वाद पवित्र मानल्या जाते. पुर्वी मध्ययुगीन काळात भारतामध्ये बाहेरील आक्रमणापासून महिलांचे संरक्षण करण्यासाठी हा सण साजरा करण्यात येत असे. महाभारतात सुध्दा बहिणभावाचे अतुट बंधन दिसून येते. श्रीकृष्णाच्या हाताच्या बोटाला जखम होऊन त्यातून रक्त वाहत होते त्यावेळी पांडवांची पत्नी द्रौपदीने आपल्या साडीची किनार फाडून श्रीकृष्णाच्या बोटाला बांधली आणि त्यांचा रक्तस्राव थांबवला.तेव्हापासुन श्रीकृष्णाने द्रौपदीचे रक्षण करण्याचा संकल्प केला आणि आजीवन द्रौपदीचा भाऊ म्हणून तिचे रक्षण केले. म्हणजेच रक्षाबंधनाची परंपरा दैवी काळापासून तर आजपर्यंत आजतागायत सुरू आहे.यावरून हेच लक्षात येते की बहिणीच्या रक्षणासाठी भाऊ काहीही करायला तयार असतो.अशा इतिहासात अनेक गोष्टी आपल्याला पहायला मिळतात. चित्तोढगडची राणी कर्मावती हिने बहादुरशहा पासून आपली रक्षा करण्यासाठी मुघल बादशहा हुमायूला राखी बांधली होती.राखी बांधल्यानंतर राजा हुमायूने राणी कर्मावतीच्या रक्षणासाठी आपल्या प्राणांची बाजी लावली असे सांगण्यात येते.यावरून स्पष्ट होते की भाऊ आपल्या बहिणीच्या रक्षणासाठी 'जान जाये पर वचन न जाये'अशी भूमिका बहिणीबद्दल भावांमध्ये दिसून येते. संपूर्ण भारतात रक्षाबंधन हा सण मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो. रक्षाबंधन म्हणजे बहीण -भावाच्या अतुट बंधन.म्हणजेच बहिण-भावाच्या नात्याचा सुवर्ण महोत्सव. कारण यामुळे दोघांचेही प्रेम एकत्र येऊन भाऊ बहीणीला पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देतो व कठीण प्रसंगी धावुन येण्याचे वचन देतो. यामुळे बहिण -भावाचे प्रेम अफाट असल्याचे दिसून येते.सध्या बहिण -भावाप्रमाणे आज वृक्षांना आपल्या बंधनात बांधण्याची नितांत गरज आहे. कारण वृक्ष रहाली तर जमीन (पृथ्वी) राहील,पृथ्वी शाबूत रहाली,तर मानव व संपूर्ण जीवजंतू आणि सृष्टी सुरक्षित राहील. कारण दिवसेंदिवस वृक्षतोडीमुळे पृथ्वी डगमगायला लागली आहे यामुळे भूस्खलन, भूकंप, सुनामी, ज्वालामुखीचा उद्रेक,अती थंडी,अती उष्णता,अती पाऊस अशाप्रकारच्या कधीच न घडलेल्या घटना दिवसेंदिवस वाढत आहेत.



याकरीता पृथ्वीला वाचविण्याची जबाबदारी आपणा सर्वांवर असल्यामुळे जास्तीत जास्त वृक्षारोपण अती आवश्यक आहे.बहिणीने भावाला राखी अवश्य बांधावी. परंतु सोबतच एक वृक्ष भेट देऊन त्यांची जोपासना करण्याचे वचनसुध्दा घ्यावे.कारण दिवसेंदिवस हवामानात बदल होतांना दिसत आहे.यामुळे अनेक पशुपक्षांचे जगणे अत्यंत कठीण झाले आहे व काही पशुपक्षी व वृक्ष लुप्त होण्याच्या मार्गावर आहेत.पुर्वी मुसळधार व संथ गतीने पाऊस यायचा. परंतु बदलत्या हवामानामुळे मुसळधार पाऊसाचे प्रमाण मोठ्याप्रमाणात वाढल्याचे दिसून येते व यामुळे ढगफुटीचे व सुनामीचे प्रमाण सुध्दा वाढले आहे. यामुळे मानवी हानी, शेतीचे नुकसान, वित्तीय हानी, समुद्राच्या पातळीत वाढ, सुनामी, भुकंप, वादळ, विजकोसळने, अती उष्णता, अती थंडी ह्या संपूर्ण भयावह घटना निसर्गाचे संतुलन डगमगल्याने निर्माण झाल्याचे दिसून येते. मानव हा बुध्दीजीवी प्राणी आहे त्यामुळे येणाऱ्या संकटांशी सामना अवश्य करू शकतो. याकरीता रक्षाबंधनाच्या निमित्ताने संपूर्ण भारतात वृक्षारोपण व्हायला हवे. त्याचबरोबर बहिणीने भावाला किंवा भावाने बहिणीला काय मौल्यवान वस्तू भेट द्यायच्या आहेत त्या अवश्य द्याव्यात.परंतु बहिणीने भावाला व भावाने बहिणीला एक -एक वृक्ष भेट देऊन धर्तीमातेचे रक्षण करण्याचा संकल्प सर्वांनीच घेतला पाहिजे. यामुळे संपूर्ण भारतात हिरवागार गालिचा निर्माण होईल. येणारे पाऊसाचे पाणी जमिनीत मुरेल व पृथ्वीचे संतुलन सुरक्षित राहील, ग्लेशियर वितळणे थांबेल, वणव्याचे प्रमाण कमी होईल, भुकंपावर आळा बसेल, अशाप्रकारे निसर्गावर येणारे संकट वृक्ष लागवडीमुळे हळूहळू कमी होण्यास मोठी मदत होईल व निसर्ग प्रफुल्लित होईल. वृक्षलागवड सांस्कृतिक, सामाजिक,सण उत्सव, राष्ट्रीय कार्यक्रम, आंतरराष्ट्रीय कार्यक्रम अशा कोणत्याही मार्गाने होने अत्यंत गरजेचे आहे. कारण यामुळे पृथ्वीचे संतुलन स्थीर रहाण्यास मोठी मदत होईल व हवामानातील वाढता बदल यावर अंकुश लावण्यास सर्वांचा हातभार कामी येईल. त्याचप्रमाणे निसर्ग प्रफुल्लित रहाला तर देशात पर्यटनाला सुध्दा मोठी चालना मिळेल. त्यामुळे रक्षाबंधनाचे औचित्य साधून बहिण-भावाने वृक्ष भेटीवर जास्तीत जास्त भर देण्याची गरज आहे.त्याचप्रमाणे सरकारने सुध्दा संपूर्ण सणांचे औचित्य साधून जास्तीत जास्त वृक्षलागवडीकडे लक्ष देण्याची गरज आहे.

सरकारने राज्यात लाडकी बहिण योजना अंमलात आणली याचे मनापासून स्वागतच अशा प्रकारच्या योजना अंमलात आणल्यानंतर प्रत्येकांना सरकारने एक-एक वृक्ष भेट देऊन पर्यावरण वाचविण्याच्या बंधनात सहभागी केले पाहिजे. सोबतच संपूर्ण प्रशासकीय विभाग,शाळा-महाविद्यालये यांना या पवित्र दिनाच्या निमित्ताने वृक्षलागवडीसाठी सरकारने प्रोत्साहीत करून निसर्गाला वाचविले पाहिजे.नारळी पौर्णिमा व रक्षाबंधनाच्या हार्दिक शुभेच्छा!

**– रमेश कृष्णराव लांजेवार**
मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.

# स्नेहाचे ऋणानुबंध चिरकाल टिकावेत : रक्षाबंधन!

**श्रावणमास** पर्व हे समाज जीवनाचे प्रतिबिंब आहे. रक्षाबंधन हे एक सामाजिक व धार्मिक पर्व आहे. हे पर्व सामाजिक परंपरेमध्ये सद्भाव, स्नेह, आत्मियता, बंधुभाव, कौटुंबिक एकात्मता यांचा प्रवाह निर्माण करणारे आहे. खऱ्या अर्थाने संस्कृतीला समृध्द बनविणारे, आध्यात्मिक स्पर्शाने जनमनाला पुलंकित करणारे पर्व आहे, रक्षाबंधन पर्व! राणी कर्णावतीने आपल्या रक्षणासाठी हुमायुँ राजाला भाऊ मानून बांधलेली राखी इतिहासाच्या पानावर कोरल्या गेली. हिंदू-मुस्लिम यांच्यामधील स्नेह व एकी निर्माण करणारी ही जीवंत साक्षच आहे. 'स्त्री' जातीच्या रक्षणासाठी धर्म, जाती, लिंग या भेदांना छेदून पुढे टाकलेले एक पाऊल आहे हे! राष्ट्रीय एकात्मेला पोषक व वर्धक प्रसंग समाजात सद्भावना व सत्प्रवृत्तींचे पोषण करण्याचे कार्य करतात. आपल्या भाऊरायाला बहीण राखी बांधते व आपल्या रक्षणाची अप्रत्यक्षरीत्या हमी घेते. हिंदू संस्कृतीतील समाजमुल्यांचे पोषण करणारी ही सामाजिक परंपरा आजही मोठया दिमाखाने देशात सर्वत्र नांदतांना दिसत आहे.

हिंदू पौराणिक कथेनुसार, महाभारतात, जे एक महान भारतीय महाकाव्य आहे, पांडवांची पत्नी द्रौपदीने भगवान श्रीकृष्णाच्या मनगटामधून वाहणारे रक्त थांबवण्यासाठी तिने तिच्या साडीचा कोपरा फाडून त्याच्या मनगटावर बांधला. त्यामुळे भगवान श्रीकृष्ण यांच्यात एक बंध निर्माण झाला आणि द्रौपदीचे रक्षण करण्याचे वचन त्यांनी तिला दिले. राखी बांधताना बहिणीने म्हणावे, ङ्गयेन बद्धो बली राजा दानवेन्द्रो महाबलः। तेन त्वामनुबध्नामि रक्षे मा चल मा चलङ्घ (दानवांचा राजा बली यांच्या हातात दैत्यगुरू शुक्राचार्य यांनी जशी रक्षा (राखी) बांधली होती तशीच ही राखी मी तुझ्या हाताला बांधत आहे)

रक्षाबंधनाची सुरुवात केव्हा झाली, याबद्दल निश्चित पुरावा नाही; पण त्याविषयी एक आख्यायिका आहे. पूर्वी देवदानवांच्या युद्धात दानवांच्या शक्तीपुढे देवांचे काही चालत नसे. दानवांचा राजा वृत्रासुर याने देवांचा राजा इंद्र याला युद्धाचे आव्हान दिले. इंद्र आपले वज्र घेऊन युद्धास निघाला. त्या वेळी इंद्राला विजय मिळावा म्हणून त्याची पत्नी शुची हिने विष्णूकडुन मिळालेला एक दोरा (राखी) इंद्राच्या हातावर बांधला. त्या राखीच्या प्रभावाने इंद्राला त्या युद्धात विजय मिळेल, अशी तिची श्रद्धा होती. शेवटी श्रध्दा खरी ठरली आणि इंद्राचा विजय झाला आणि त्याचे गेलेले वैभव परत मिळाले. या प्रसंगाची आठवण म्हणून मनगटावर राखी बांधण्याची पद्धत पडली, असे सांगितले जाते.

हिंदू पंचांगाप्रमाणे श्रावणात येणारी राखी पौर्णिमा ही नारळी पौर्णिमेच्या दिवशी किंवा पौर्णिमा लागोपाठ दोन दिवस असेल तर दुसऱ्या दिवशी असणाऱ्या पौर्णिमेला साजरी करतात. याच दिवसाला 'रक्षाबंधन' म्हणतात. या दिवशी रक्षाबंधनाचा कार्यक्रम असतो. हा सण बहीण भावाच्या अतूट, उत्कट प्रेमाची आठवण करून देणारा दिवस आहे. श्रावण पौर्णिमेस राखी बांधावी, असे धर्मशास्त्रात म्हणले आहे. या विधीस 'पवित्रारोपण' असेही म्हणतात. भावाचा उत्कर्ष व्हावा, आपल्या भावाने आपले रक्षण करावे, ही यामागची मंगल मनोकामना असते. उत्तर भारतात हा सण राखी म्हणून प्रसिद्ध आहे. या दिवशी बहिणी आपल्या भावाच्या उजव्या हाताच्या मनगटावर राखी बांधून ङ्गभावास दीर्घ आयुष्य व सुख लाभो मिळोङ्घ अशी कामना करतात. राखी बांधण्याचा अर्थ ती बांधणाऱ्या व्यक्तीच्या प्रेमरूपी बंधनात स्वतःला गुंतवून त्या व्यक्तीच्या रक्षणाची जबाबदारी स्वीकारणे. राखी बांधण्याच्या या सणातून स्नेह व परस्परप्रेम वृद्धिंगत करण्याची प्रथा अस्तित्वात आली आहे. रक्षाबंधन म्हणजे हातातील राखीस साक्षी मानून आपल्या बहिणीचे सदैव रक्षण करण्याचे वचन देणे. काही प्रांतात नोकर आपल्या मालकाला, ब्राह्मण आपल्या यजमानाला, मुलगी आपल्या वडिलांना, आणि पत्नी नवऱ्याला राखी बांधते. आपल्यापेक्षा बलवान, समर्थ माणसाला राखी बांधून आपल्या रक्षणाचे वचन घेणे हीच यामागची भावना आहे. भारतीय समाजात ऐक्य आणि प्रेमभाव वाढीस लागावा यासाठी रक्षाबंधनाचा सण राजपूत लोकांत रूढ झाला. आजकाल मात्र बहीण-भावाच्या पवित्र प्रेमाचा सण म्हणून हा सण साजरा होतो. या दिवशी बहिणी आपल्या सख्ख्या भावाच्या हातावर राखी बांधतातच आणि शिवाय त्या बंधुत्वसमान नाते असलेल्या व्यक्तीसही राखी बांधतात.




उत्तर भारतातील ग्रामीण भागांत जिथे अनेक खेड्यांमध्ये बहिर्विवाह पद्धती प्रचलित आहे, तिथे मोठ्या संख्येने विवाहित हिंदू स्त्रिया दरवर्षी त्यांच्या पालकांच्या घरी सणासाठी परत जातात. त्यांचे भाऊ, जे विशेषतः पालकांसोबत किंवा जवळपास राहतात, कधीकधी त्यांच्या बहिणींच्या विवाहित घरी त्यांना परत घेऊन आणण्यासाठी जातात. अनेक तरुण विवाहित स्त्रिया त्यांच्या जन्माच्या घरी काही आठवड्यांपूर्वी येतात आणि समारंभ होईपर्यंत राहतात. भाऊ हे बहिणीचे सासर आणि माहेर यांच्यामध्ये आजीवन मध्यस्थ म्हणून काम करतात. शहरी भारतात जिथे कुटुंबे अधिकाधिक विभक्त होत आहेत, तिथे हा सण अधिक प्रतीकात्मक बनला असला तरीही तो खूप लोकप्रिय आहे. या उत्सवाशी संबंधित विधी त्यांच्या पारंपारिक प्रदेशांच्या पलीकडे पसरले आहेत. तंत्रज्ञान, स्थलांतर, चित्रपट, सामाजिक संवाद, आणि हिंदू धर्माच्या राजकीय प्रचाराद्वारे या सणाचे स्वरूप बदलले जात आहे. रक्ताचे नाते नसलेल्या स्त्रिया आणि पुरुषांमध्ये स्वैच्छिक नातेसंबंधांची एक बदललेली परंपरा देखील आहे. यासाठी जाती आणि वर्गाच्या पलीकडे, तसेच हिंदू आणि मुस्लिम हा भेद विसरून राखी बांधली जात आहे.

जैन परंपरेमध्ये सातशे मुनींवर दृष्ट प्रवृत्तीने केलेल्या उपसर्गाला दुर करण्याचे कार्य या पर्वमध्ये झाले. जैन लोक रक्षाबंधनाच्या दिवशी जैन मंदिरात जाऊन अभिषेक-पूजन करुन मुनीं प्रती हृदयभाव ठेवून पंडित-पुजाऱ्यांच्या हस्ते राखी बांधून हे पर्व साजरे करतात. धर्मरक्षणाचे चक्र कण आहे ते ! प्रथम धार्मीक व नंतर सामाजिक दायित्व पार पाडले जाते. हे पर्वधर्म व धर्मावलय यांच्येशी मातृत्व भावनेतून जोडणारे आहे. संस्कृती व धर्म समर्पणाच्या भावनेला वृध्दिगत करणारे आहे. श्रमण संस्कृतिमध्ये रक्षाबंधनाचे आगळे वेगळे वैशिष्ट्य आहे. ईश्वरप्रती समर्पणाची भावना व संस्कृतिचा अत्यंत आदरया भावनांना श्रेष्ठस्थान दिले गेले आहे. सामाजिक दृष्टिकोनातून रक्षाबंधन हे वात्सल्य व बंधुभावाचे परिपाक पर्व आहे. बंधुभाव व स्नेहवर्धनाचे पाठया पर्वामुळे गिरविले जातात. समाज व धर्म या पेक्षाश्रेष्ठ आहे राष्ट्रधर्म ! म्हणून सामाजिक व धार्मीक अस्तित्व टिकविण्याची आज राष्ट्राचे अस्तित्व टिकविण्याची, त्याचे जतन करण्याची गरजभासत आहे. ही महान जबाबदारी आज आपणांवर आहे. ती नेटाने करणे गरजेचे आहे, त्यामुळेही घडी नीट घट्ट बसेल. आलमगीर बादशहा दिल्लीवर राज्य करीत होता. त्याच्या प्रधानाने कट आखून बादशहाचा खून केला व प्रेत नदीत टाकून दिले. एका स्त्रिने ते पाहिले. प्रेत वाहून जाऊ नये म्हणून तिने प्रेत पाण्याबाहेर काढले आणि प्रेताचा वाली येईपर्यंत प्रेताजवळ बसून राहिली. बऱ्याच वेळानंतर बादशहाच्या शोधात सैनिक तेथे आले. बादशहाचा मुलगा शहाआलम याने त्या हिंदू स्त्रीचे आभार मानले. तिला आपली बहीण मानले. ती हिंदू स्त्री पुढे दरवर्षी शहाआलमला राखी बांधू लागली. ही प्रथा पुढे अकबरशहा व बहादूरशहा यांनीही चालू ठेवली. इतिहासात याचा उल्लेख आहे. मुघल बादशहानी पवित्र मानलेला हिंदूंचा हा एकमेव सण आहे.

या श्रावण पौर्णिमेला 'पोवती पौर्णिमा' असेही म्हणतात. कापसाच्या सुताच्या नवसुती (नऊ धाग्यांची जुडी) करून तिला आठ-बारा किंवा चोवीस गाठी मारतात व त्यांच्या ठिकाणी ब्रह्मा, विष्णू, महेश, ओंकार, सूर्य इत्यादी देवतांचे आवाहन करून हे पोवते प्रथम देवास वाहून नंतर तसलीच पोवती कुटुंबातील माणसांच्या मनगटावर बांधली जातात. रक्षाबंधनाच्या निमीत्ताने पर्यावरणाचे रक्षण, ऑलिम्पिक खेळाडूंना शुभेच्छा आणि स्त्रीभृणहत्या रोखण्याचा संदेश राखीच्या माध्यमातून करण्याचा निर्धार भाऊ-बहिण आणि समस्त भारतीयांनी या नाजुक पर्वावर केला पाहिजे. रक्षाबंधन निमित्त सर्व बंधु-भगिनींना मन:पूर्वक शुभेच्छा!

**– प्रविण बागडे**

**रक्षाबंधन**

पांच धागे रक्षाबंधन
पवित्र आहे रक्षाबंधन
भावाचे बहिणीला असे पवित्र वंदन
बहीण भावाचे पवित्र नाते
रक्षाबंधन आठवण देते
बहीण ओवाळते लाडक्या भावा
संकट समयी करते धावा
लाडका भाऊ वचन पळतो
बहिणी साठी धावून येतो
बहीण-भाऊंचे नाते बळकट
दूर करते बहिणीचे संकट

**– धोंडीरामसिंह राजपूत**

## रक्षाबंधन बहीण-भावाच्या अटूट स्नेहाचा उत्सव

देशात विविध सण-उत्सव मोठ्या उत्साह व आनंदाने संपन्न होतात. सर्वच उत्सव देशवासी गुण्या गोविंदाने साजरे करतात. या उत्सवातील बहीण - भावाच्या अटूट नात्याची आठवण करून देऊन बहिणीच्या सुख दुःखात भावाच्या कर्तव्याची जाणीव करून देणारा सण म्हणजे रक्षाबंधन होय.बहीण भावाचे नाते या विश्वातील अत्यंत पवित्र व मंगलमय नाते मानल्या जाते.हे नाते असेच अटूट रहावे, भावाने बहिणीच्या सुख दुःख काळात बहिणीच्या हाकेला ओ---देऊन बहिणीला संकट काळात सर्वतोपरी सहाय्य करावे याची आठवण द्यायला हा सण दरवर्षी येतो असे मानतात.रक्षाबंधनाचे पांच धागे हे भावाला बहिणीच्या

रक्षणाची, स्नेह, तथा कर्तव्याची जाणीव व आठवण करून देणारे धागे असतात.या संदर्भात चित्तोडच्या

राणी कर्णावती ची कथा प्रसिद्ध आहे.राणी कर्णावतीने हुमायुनला आपला भाऊ म्हणून राखी पाठविली होती. अपेक्षा हीच होती की, हुमायून ने संकट काळात मदत करावी.राणी कर्णावतीवर तत्कालीन बहादूर शहा नावाच्या बादशहाने आक्रमण केले. राणीच्या राखीचे पावित्र्य व बहीण स्नेह जपत हुमायून मानलेल्या बहिणीच्या रक्षणार्थ ,जात ,पात, धर्म बाजूला ठेऊन धावून आला व बहिणीचे रक्षण केले.ही राखीचे महत्ती आज प्रत्येक भावाने ओळखण्याची गरज आहे. कोळी बांधव पावसाचे दोन महिने समुद्रात मासेमारीसाठी जात नाहीत, मात्र श्रावण महिन्यात कोळी बांधव श्रावणी पौर्णिमा दिनी समुद्राला नारळ अर्पण करून मासेमारी करायला निघतात म्हणून ही या सणाला 'नारळी पौर्णिमा'असेच म्हणतात. रक्षाबंधनाचे हे पांच धागे स्नेह व कर्तव्याची जाणीव करून देणारे असतात.सीमेवर सैनिकांना किंवा तुरुंगातील कैद्यांना ही काही भगिनी राखी पाठवितात किंवा बांधतात.असा हा भारतीय नीतिमत्ता,कर्तव्य पालनता, व जबाबदारीची जाणीव करून देणारा 'रक्षाबंधन' सण बहीण -भाऊनी साजरा करून भारतीय संस्कृती व नैतिक मूल्यांचे पालन करावे व बहीण -भाऊ यांचे पवित्र नाते जपावे अशी अपेक्षा आहे.

**– धोंडीरामसिंह राजपूत**

# रक्षाबंधन : धागा नात्यांचा, जबाबदारी माणुसकीची

**श्रावणातील** पौर्णिमा आली की घराघरांत एक वेगळीच लगबग सुरू होते. हातात राखी, कपाळावर कुंकवाचा टिळा, औक्षणाचे ताट, मिठाईचा गोडवा आणि डोळ्यांत भावनांचा ओलावा. रक्षाबंधन हा केवळ भाऊ-बहिणीच्या नात्याचा सण नाही; तो प्रेम, विश्वास, जिव्हाळा आणि परस्पर जबाबदारीची आठवण करून देणारा दिवस आहे. हातावर बांधला जाणारा राखीचा धागा दिसायला छोटा असतो, पण त्यात एका बहिणीची माया आणि भावाच्या संरक्षणाची जबाबदारी गुंफलेली असते. मात्र आज प्रश्न एवढाच आहे, राखी बांधून संरक्षणाचे वचन देणे पुरेसे आहे का? बहिणीच्या हाताला राखी बांधताना तिच्या स्वातंत्र्याचा, सन्मानाचा आणि सुरक्षिततेचा विचारही केला पाहिजे. कारण संरक्षण म्हणजे तिच्यावर बंधने लादणे नव्हे, तर तिला स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी बळ देणे होय. तिच्या शिक्षणाला पाठबळ देणे, तिच्या स्वप्नांना दिशा देणे आणि तिच्या निर्णयांचा आदर करणे, हेच खरे रक्षाबंधन!

आजच्या काळात मुली उच्च शिक्षण घेत आहेत, अंतराळात झेपावत आहेत, सैन्यात सेवा देत आहेत, प्रशासनात नेतृत्व करत आहेत, उद्योग उभारत आहेत. मग 'तू मुलगी आहेस' म्हणून तिच्या स्वप्नांना कुंपण का? तिच्या कपड्यांवर, मित्रमैत्रिणींवर, करिअरवर, विवाहाच्या निर्णयावर आणि आयुष्याच्या निवडीवर नियंत्रण ठेवणे याला संरक्षण म्हणायचे का? नाही! हे संरक्षणाच्या नावाखाली स्वातंत्र्यावर घातलेले बंधन आहे. रक्षाबंधनाचा खरा अर्थ समाजाने नव्याने समजून घेण्याची गरज आहे. आज अनेक बहिणी घरापासून दूर आहेत. काही शिक्षणासाठी, काही नोकरीसाठी, काही संसारासाठी तर काही आपल्या स्वप्नांच्या शोधात हजारो किलोमीटर दूर गेल्या आहेत. मोबाईलच्या पडद्यावरून आलेली 'हॅपी रक्षाबंधन'ची शुभेच्छा, ऑनलाइन पाठवलेली राखी आणि डिजिटल पेमेंटमधून आलेली ओवाळणीची रक्कम, या सगळ्यामुळे अंतर कमी झाले आहे, पण भावनिक जवळीक टिकवण्याची जबाबदारी अजूनही आपलीच आहे. कधी काळी भाऊ बहिणीच्या रक्षणाची शपथ घेत असे. आज काळ बदलला आहे. आता बहीणही भावाच्या आयुष्याची ताकद आहे आणि भाऊही बहिणीच्या स्वप्नांचा साथीदार आहे. त्यामुळे हे नाते एकतर्फी संरक्षणाचे नसून परस्पर आधाराचे झाले पाहिजे. राखीचा धागा जात, धर्म, भाषा, श्रीमंती-गरिबी यापलीकडे जाणारा आहे. इतिहासातही राखीने माणुसकीचे बंध जोडले आहेत. म्हणूनच आज रक्षाबंधनाच्या निमित्ताने समाजाने एका व्यापक प्रश्नाकडे पाहिले पाहिजे, आपण आपल्या बहिणीचे रक्षण करतो, पण शेजारच्या मुलीच्या सन्मानाचे काय? आपल्या घरातील स्त्रीला सुरक्षित ठेवतो, पण सार्वजनिक ठिकाणी एखाद्या महिलेशी गैरवर्तन होताना आपण गप्प का बसतो? राखी जर मनगटावर बांधली आणि माणुसकी मात्र मनात बांधली नाही, तर त्या राखीचा अर्थ अपुरा आहे. स्त्रीसुरक्षेची जबाबदारी केवळ भावाची नाही. ती कुटुंबाची, समाजाची आणि शासनाचीही आहे. मुलींना 'सावध राहा' असे सांगण्यापेक्षा मुलांना 'स्त्रीचा सन्मान करा' असे शिकवण्याची वेळ आली आहे. मुलीला रात्री बाहेर जाऊ नकोस म्हणण्यापेक्षा रस्ते, सार्वजनिक वाहतूक आणि परिसर सुरक्षित करण्याची जबाबदारी व्यवस्था स्वीकारणार कधी? रक्षाबंधन आपल्याला हाच कठोर प्रश्न विचारते. आज राखीच्या निमित्ताने प्रत्येक भावाने आपल्या बहिणीला एक वचन द्यावे, तुझ्या स्वप्नांना माझ्या संरक्षणाची नव्हे, माझ्या पाठिंब्याची गरज आहे. तू डॉक्टर होऊ इच्छित असशील तर हो, अधिकारी बनू इच्छित असशील तर बन, व्यवसाय करायचा असेल तर कर, कला-साहित्य क्षेत्रात जायचे असेल तर जा. तुझ्या वाटेतील अडथळा होण्याऐवजी मी तुझ्या पंखांना बळ देईन आणि प्रत्येक बहिणीनेही भावाला एवढेच सांगावे. तुझ्या आयुष्यातील प्रत्येक संघर्षात मी तुझ्या सोबत आहे. कारण भाऊ-बहीण हे केवळ रक्ताचे नाते नसते, ते आयुष्यभराच्या आठवणींचे, भांडणांचे, लाडांचे, काळजीचे आणि निःस्वार्थ प्रेमाचे नाते असते. बालपणीच्या छोट्या छोट्या भांडणांपासून ते मोठेपणीच्या जबाबदाऱ्यांपर्यंत हे नाते सतत बदलत जाते. कधी बहीण आईसारखी काळजी घेते, कधी भाऊ वडिलांसारखा आधार देतो. पण दोघांमध्ये एक गोष्ट कायम असते 'काहीही झाले तरी तू एकटा/एकटी नाहीस' हा विश्वास. म्हणूनच रक्षाबंधन हा फक्त राखी, मिठाई आणि भेटवस्तूंचा उत्सव होऊ नये. तो नात्यांची उजळणी करणारा आणि माणुसकीची बांधिलकी मजबूत करणारा दिवस व्हावा. आज आपण प्रत्येक स्त्रीच्या सन्मानाची राखी बांधू या. प्रत्येक मुलीच्या शिक्षणाची राखी बांधू या. तिच्या स्वप्नांच्या स्वातंत्र्याची राखी बांधू या. अन्यायाविरुद्ध आवाज उठवण्याची राखी बांधू या आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे, माणुसकीच्या मनगटावर माणुसकीचीच राखी बांधू या. कारण राखीचा धागा तुटला तर पुन्हा बांधता येतो, पण विश्वासाचा धागा तुटला तर नाते आयुष्यभरासाठी जखमी होते. या रक्षाबंधनाला केवळ बहिणीच्या मनगटावर राखी नको, तिच्या डोळ्यांतील स्वप्नांना सुरक्षित आकाश हवे. तिच्या पावलांना बंधने नकोत, उंच भरारी घेण्याची मोकळीक हवी. आणि भावाच्या प्रेमाला केवळ शब्द नकोत, आयुष्यभराची साथ हवी. रक्षाबंधन म्हणजे एका धाग्याचे नव्हे, तर आयुष्यभर जपलेल्या विश्वासाचे पर्व आहे. सर्व भाऊ-बहिणींना प्रेम, विश्वास, स्नेह आणि अखंड नात्याच्या या पवित्र पर्वाच्या मनःपूर्वक, हृदयस्पर्शी रक्षाबंधनाच्या हार्दिक शुभेच्छा!

**– प्रवीण बागडे**

# खवड्या डोंगर प्रकरण आई-वडिलांना एकत्र आणण्यासाठी कुणालने धमकी दिली; मावशीचे स्पष्टीकरण

छत्रपती संभाजीनगर, दि. २७ (प्रतिनिधी) - खवड्या डोंगरावर चांदगुडे कुटुंबातील तिघांनी जीवन संपवल्याच्या प्रकरणात आता नवा ट्विस्ट आला आहे. एमआयडीसी वाळूज पोलिसांनी बुधवारी मृत मुरलीधर आणि संगीता यांच्या आई-वडील व प्रत्येकी तीन बहिणींचे सविस्तर जबाब नोंदवले. मात्र, 'आत्महत्येचे नेमके कारण त्या तिघांनाच माहिती' असे सांगत दोन्ही कुटुंबांनी एकमेकांविरुद्ध तक्रार देण्यास नकार दिला आहे, अशी माहिती वरिष्ठ पोलिस निरीक्षक रामेश्वर गाडे यांनी दिली.

दुसरीकडे, संगीता यांची लहान बहीण कल्याणी यांनी हा मृत्यू म्हणजे आत्महत्या नसून अपघात असल्याचा थेट दावा केला आहे. आई-वडिलांना एकत्र आणण्यासाठी त्याने डोंगरावर जाऊन भावनिक धमकी दिली असावी, मात्र तेथे समजवताना धक्का लागून तो अपघात झाला, असेही कल्याणी म्हणाल्या.

**मागील वर्षीचा प्रकार केवळ गैरसमज -** गेल्या वर्षी कुणालने आत्महत्येचा प्रयत्न केल्याची बाब कल्याणी यांनी फेटाळून लावली. कुणालला केवळ एकांत हवा होता, त्याने आईला तसा मेसेजही केला होता.

मात्र, तो मेसेज न पाहिल्याने भीतीने संगीता यांनी थेट चिकलठाणा पोलिस ठाणे गाठले होते. रात्री ११ वाजता तो केवळ गैरसमज असल्याचे पोलिसांसमोर स्पष्ट झाले होते, असे कल्याणी यांनी सांगितले.

# नागरी सहकारी बँकांमधील नवीन पहाट

**रिझर्व** बँक ऑफ इंडियाने घेतलेल्या नुकत्याच एका निर्णयानुसार, नव्या नागरी सहकारी बँकांसाठी अनेक वर्षानंतर परवानगी देण्यात येणार आहे.

गुजरातमधील माधवपुरा बँकेचे प्रकरण घडल्यानंतर सन २००४ सालापासून नव्या नागरी सहकारी बँकांना परवाने देणे बंद करण्यात आले होते. साधारण २१ वर्षानंतर या बाबतीत सकारात्मक विचार सुरू झाले. बँकिंग क्षेत्रातील खाजगी आणि राष्ट्रीयीकृत बँकांच्या स्पर्धेला सामोरे जाऊन नागरी सहकारी बँकांची स्थिती भक्कम झाल्यामुळे रिझर्व बँकेने दोन दशकानंतर हा निर्णय घेतला आहे.

**निर्णयाचे महत्व-** सहकार क्षेत्रासाठी हा निर्णय अत्यंत महत्त्वाचा असून यामुळे नव्या नागरी सहकारी बँकांची बँकिंग क्षेत्रात भर पडणार आहे. या निर्णयामुळे रिझर्व बँक ऑफ इंडिया चा नागरी सहकारी बँका या प्रारूपावरील विश्वास दृढ झाल्याचे दिसून येते.

बँकिंग क्षेत्रातील परिचालनाच्या दृष्टीने नागरी सहकारी बँका अन्य बँकांच्या स्पर्धेत सक्षम आहेत असाही या निर्णयाचा अर्थ निघतो. रिझर्व बँकेच्या धोरणानुसार नव्या नागरी सहकारी बँकांसाठी पुढील अटींची पूर्तता करणे आवश्यक आहे.

**पात्रता -** ज्या पतसंस्थांनी दहा वर्षे व्यवस्थित व्यवसाय केला आहे, अशा पतसंस्था नव्या नागरी सहकारी बँकांसाठी अर्ज करण्यास पात्र ठरतील.

**किमान भाग भांडवल-** संस्थेचे वसूल भाग भांडवल ३०० कोटी रुपये पेक्षा अधिक असावे.

**ठेवींचा आकार-** संस्थेकडे किमान दहा हजार कोटी रुपयांच्या ठेवी असल्या पाहिजेत.

**नोंदणी -** संस्थेची नोंदणी, मल्टीस्टेट सहकारी संस्था म्हणून झालेली असावी. अनुत्पादक कर्ज NPA - संस्थेचे नेट एन पी ए तीन टक्के पेक्षा कमी असावेत.

पर्याप्त भांडवल CRAR - संस्थेचे पर्याप्त भांडवल किमान १२ टक्के असले पाहिजे. एन.पी.ए. आणि पर्याप्त भांडवलाचा आकडा काढताना मागील वर्षाच्या लेखापरीक्षण झालेल्या ताळेबंदाचा आकडा गृहीत धरण्यात येईल. पर्याप्त भांडवल आणि अनुत्पादक कर्ज यांचा आकडा काढत असताना नागरी सहकारी बँकांना सध्या लागू असलेल्या नियमाप्रमाणे तो काढलेला असावा.

**भाग भांडवल-**संस्थेच्या कोणत्याही सभासदाकडे वसूल भाग भांडवलाच्या पाच टक्के पेक्षा अधिक भाग भांडवल नसावे.

**संचालक पात्रता -** संचालकांच्या पात्रते साठी सध्या नागरी सहकारी बँकांना लागू असलेले फिट अँड प्रॉपर पद्धतीचे नियम लागू राहतील.

**व्यवसाय नियोजन -** बँकिंग परवान्यासाठी अर्ज करीत असताना संस्थेला भविष्यातील बँकिंग व्यवसायाच्या नियोजनाचा आराखडा सादर करावा लागेल. वरील अटी व्यतिरिक्त रिझर्व बँक ऑफ इंडिया ने अर्ज सादर करत असताना कोणती कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे त्याची यादी दिली आहे. परवाना कोणत्या पद्धतीने दिला जाईल याबाबतचा तपशील ही या सूचनेत देण्यात आलेला आहे.

**सहकारातील संधी -** रिझर्व बँक ऑफ इंडियाच्या या निर्णयाकडे सहकार क्षेत्रातील संधी म्हणून पाहता येईल. मल्टीस्टेट पतसंस्थांना स्वतःचे रूपांतर बँकेत करण्याची ही सुवर्णसंधी प्राप्त झाली आहे. या संस्थांच्या ठेवीदारांना बँकिंग मध्ये रूपांतर होताच ठेवी वरील विम्याचे संरक्षण आपोआप लागू होईल. ठेवीदारांच्या हिताच्या दृष्टीने हा अत्यंत महत्त्वाचा मुद्दा आहे.

या निर्णयामुळे सहकार क्षेत्रात रोजगाराच्या नव्या संधी प्राप्त होतील. जुन्या अधिकारी, कर्मचारी वर्गाला आपली कार्यक्षमता दाखवण्यासाठी नवे क्षेत्र उपलब्ध होईल. नागरी सहकारी बँकिंग क्षेत्रात नव्या बँकांच्या आगमनामुळे स्पर्धेला तोंड द्यावे लागेल. कार्यक्षमता आणि उत्तम ग्राहक सेवा याकडे सर्वच बँकांना लक्ष द्यावे लागेल. नागरी सहकारी बँकांपैकी बहुतांशी नागरी सहकारी बँकांचे अस्तित्व महाराष्ट्रामध्ये आहे. रिझर्व बँकेच्या या निर्णयामुळे नव्या संस्था महाराष्ट्र पातळीवर अस्तित्वात येतील. महाराष्ट्राला त्याचा अनेक दृष्टीने फायदा होईल. अत्यंत चांगला निर्णय असे या निर्णयाचे वर्णन करता येईल.

**- डॉ. अभय मंडलिक**

- लेखक बँकिंग विषयाचे अभ्यासक असून खामगाव अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेचे संचालक आहेत

# वैजापूर पालिका कर्मचारी, सफाई कामगार यांची आरोग्य तपासणी




वैजापूर, दि. २७ (प्रतिनिधी) - 'आरोग्य हीच खरी संपत्ती 'असून ,आपल्या आरोग्याची तपासणी वारंवार करून सफाई कामगार,कर्मचारी,नागरिक यांनी आपले आरोग्य सक्षम ,सुदृढ, निकोप, निरोगी व उत्तम राखावे असे आवाहन सेवा निवृत्त शिक्षण अधिकारी तथा जिल्हा आरोग्य समिती सदस्य धोंडीरामसिंह राजपूत

यांनी पालिकेच्या भगवान महावीर रुग्णालयात गुरुवार (ता,२७) रोजी आरोग्य तपासणी शिबिरात केले.जिल्हा आरोग्य रुग्णालयाचे जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.कमलाकर मुदखेडकर, कार्यक्रम अधिकारी साधना गंगावणे, उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ.अरविंद हरबडे, वैजापूर, पालिकेचे मुख्याधिकारी भागवत बिघोत राजपूत,भगवान महावीर रुग्णालय ,प्रेरणा सामाजीक संस्थ्या, संपूर्ण सुरक्षा केंद्र व आयसीटीसी विभाग उप जिल्हा रुग्णालय यांनी आयोजित केलेल्या या कार्यक्रमात राजपूत बोलत होते.या शिबिरात दोनशे कर्मचारी यांची मधुमेह तपासणी,रक्तदाब तपासणी, एचआयव्ही तपासणी करून आरोग्य शिक्षण बाबत मार्गदर्शन ही करण्यात आले.

उप जिल्हा रुग्णालय व आपला दवाखाना चे सर्वश्री कुष्ठ रोग तज्ज्ञ डॉ. भास्कर दुधारे,वैद्यकीय अधिकारी डॉ. शुभम मिश्रा,डॉ. शुभांगी राजपूत, डॉ.प्रकाश राठोड, स्टाफ नर्सेस शिल्पा वानखेडे, निर्मला जाधव, सहायक अशोक गाडेकर, तसेच आयसिटीसी विभाग प्रमुख विजय पाटील, संजय शिराळे, मनीषा जाधव (मूळे), माया पाटील, स्वच्छता निरीक्षक जगन्नाथ थोरात, प्रेरणा सामाजिक संस्थेचे बापू वाळके, साई बारगळ, तालुका आरोग्य कार्यालय चे माधव सिरसाट, नितीन जाधव, जोत्सना भेंडेकर, याच्या सहकार्याने ही आरोग्य तपासणी करून योग्य वैद्यकीय सल्ला व मार्गदर्शन करण्यात आले.

### महावितरणच्या ३३ केव्ही मोतीबाग उपकेंद्राला आंतरराष्ट्रीय आयएसओ मानांकन!

# दर्जेदार सेवा देण्यासाठी उपकेंद्रांची गुणवत्ता महत्त्वाची - संचालक (मानव संसाधन) राजेंद्र पवार



जालना, दि. २७ (प्रतिनिधी) - ग्राहकांना गुणवत्तापूर्ण, सुरक्षित आणि अखंडित वीजपुरवठा उपलब्ध करून देण्यासाठी महावितरणकडून वीज वितरण यंत्रणेच्या सक्षमीकरणावर भर दिला जात आहे. याच अनुषंगाने जालना शहरातील ३३ केव्ही मोतीबाग उपकेंद्राच्या उत्कृष्ट कामकाजाची दखल घेत या उपकेंद्राला 'आयएसओ ९००१:२०१५' हे मानांकन प्राप्त झाले आहे. विद्युत उपकेंद्रांमध्ये जिल्ह्यातील पहिलेच आयएसओ मानांकन मिळवण्याचा बहुमान मोतीबाग उपकेंद्रास मिळाला आहे. महावितरणचे संचालक (मानव संसाधन) राजेंद्र पवार यांच्या हस्ते अभियंते व कर्मचाऱ्यांना आयएसओ प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले.

यावेळी संचालक पवार म्हणाले की, विद्युत उपकेंद्राची गुणवत्ता थेट ग्राहक सेवेशी निगडित असते. 'इज ऑफ लिव्हिंग' अर्थात ग्राहकांचे जीवनमान उंचावण्यासाठी सुरळीत वीजपुरवठा हा अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. मोतीबाग उपकेंद्रातील सुधारणा आंतरराष्ट्रीय मानकावर झाली असून, ही महावितरणसाठी अत्यंत कौतुकाची आणि अभिमानाची बाब आहे.

मुख्य अभियंता दीपक कुमठेकर म्हणाले की, आयएसओ मानांकन मिळवणारे हे महावितरणचे परिमंडलातील सातवे विद्युत उपकेंद्र ठरले आहे. इतर अभियंता व कर्मचाऱ्यांनी यातून प्रेरणा घेत आपल्या कार्यक्षेत्रात सुधारणा कराव्यात, असे आवाहन त्यांनी केले.

हे यश मिळिवण्यासाठी जालना मंडलाचे अधीक्षक अभियंता युवराज जरग, जालना-१ विभागाचे कार्यकारी अभियंता अतुल देवकर, शहर उपविभागाचे अतिरिक्त कार्यकारी अभियंता अब्दुल जब्बार, सहायक अभियंता संजय गहाणे, प्रधान यंत्रचालक रामदास गिते, यंत्रचालक अनिल वाघ, अविनाश अंभोरे यांच्यासह अधिकारी व कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.मोतीबाग उपकेंद्राला आयएसओ मानांकन मिळवून देण्यासाठी अधिकारी व कर्मचाऱ्यांनी एकजुटीने आणि पूर्ण क्षमतेने केलेल्या प्रयत्नांचे संचालक राजेंद्र पवार व मुख्य अभियंता दीपक कुमठेकर यांनी कौतुक करून सर्वांचे अभिनंदन केले. त्यांच्या हस्ते कार्यकारी अभियंता अतुल देवकर व अभियंते, कर्मचाऱ्यांना आयएसओ प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले.

# श्वेता तिवारी प्रकरणात मोठा ट्विस्ट; ट्रोलर मनसेचा सदस्य नसल्याचं उघड

मुंबई, दि. २७ (प्रतिनिधी) - अभिनेत्री श्वेता तिवारीने ऑनलाइन महिलांविरोधात आक्षेपार्ह आणि अपमानजनक टिप्पणी करणाऱ्या काही सोशल मीडिया वापरकर्त्यांबाबत मनसे प्रमुख राज ठाकरे यांना प्रश्न विचारल्यानंतर घडलेल्या घटनांबाबत स्पष्टीकरण दिले आहे. संबंधित व्यक्ती मनसेचे सदस्य नसल्याचे पक्षाशी संबंधित एका वकिलाने आपल्याला स्पष्ट केल्याचे श्वेताने सांगितले.

काही दिवसांपूर्वी श्वेताने महिलांविरोधात आक्षेपार्ह भाषा वापरणाऱ्या काही सोशल मीडिया अकाउंट्सचे स्क्रीनशॉट शेअर केले होते. यातील काही जण मनसे समर्थक असल्याचा दावा करत असल्याचे सांगत, अशा वर्तनाला पक्षाचा पाठिंबा आहे का, असा सवाल तिने राज ठाकरे यांच्याकडे केला होता. यानंतर मनसे समितीशी संबंधित एका वकिलाने श्वेताशी संपर्क साधला. संबंधित व्यक्ती पक्षाची सदस्य नसल्याचे तसेच महिलांविरोधातील अशा प्रकारच्या वर्तनाला पक्ष समर्थन देत नसल्याचे त्यांच्याकडून स्पष्ट करण्यात आल्याचे श्वेता तिवारीने सांगितले. श्वेताच्या म्हणण्यानुसार, या व्यक्तीचा शोध घेण्यासाठी काही दिवसांची मुदत मागण्यात आली होती. मात्र, अवघ्या तीन दिवसांत संबंधित व्यक्तीचा फोन नंबर आणि त्याने स्वतःच्या हस्ताक्षरात लिहिलेले माफीपत्र त्यांना पाठवण्यात आले. श्वेताने या माफीपत्राचा स्क्रीनशॉटही इन्स्टाग्राम स्टोरीवर शेअर केला. या प्रकरणाचा पाठपुरावा केल्याबद्दल श्वेताने मनसे टीमचे आभार मानले. महिलांचा अपमान करणाऱ्या वर्तनाला गांभीर्याने घेतल्याचेही श्वेताने नमूद केले.

दरम्यान, या घटनेनंतर श्वेताने ऑनलाइन ट्रोलिंग आणि महिलांच्या छळाच्या व्यापक समस्येवरही चिंता व्यक्त केली. सोशल मीडिया आणि स्क्रीनमागे लपून कोणत्याही परिणामांची भीती न बाळगता महिलांवर आक्षेपार्ह टिप्पणी करणाऱ्यांची संख्या मोठी असल्याचे तिने म्हटले. ही समस्या केवळ एका व्यक्ती किंवा एका घटनेपुरती मर्यादित नसून, 'महिलांचा ऑनलाइन छळ करण्याला कोणताही परिणाम भोगावा लागणार नाही', अशी मानसिकता बदलण्याची गरज असल्याचे श्वेताने सांगितले. तंत्रज्ञान कंपन्या आणि सोशल मीडिया प्लॅटफॉर्म्सनी ऑनलाइन छळ, विशेषतः महिलांविरोधातील गैरवर्तन रोखण्यासाठी प्रभावी उपाययोजना करण्याची गरज असल्याचेही श्वेता तिवारीने अधोरेखित केले.

# निजामशाहीकालीन वारशाची ऐतिहासिक सफर; महमूदपुरा हेरिटेज वॉकचे रविवारी आयोजन

छत्रपती संभाजीनगर, दि. २७ (प्रतिनिधी) - मध्ययुगीन काळातील बलाढ्य फौजांना दख्खनमध्ये आपल्या कर्तृत्वाने थोपवणारा आणि नहरीने पाणी आणून जुन्या खडकीचे सुनियोजित शहरात रूपांतर करणारा निजामशाहीचा वजीर मलिक अंबर यांच्या ऐतिहासिक वारशाची ओळख करून देण्यासाठी 'महमूदपुरा हेरिटेज वॉक'चे आयोजन करण्यात आले आहे.

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका आणि INTACH, छत्रपती संभाजीनगर चॅप्टर यांच्या संयुक्त विद्यमाने हा हेरिटेज वॉक रविवार, दि. ३० ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ७ ते ९ या वेळेत आयोजित करण्यात आला आहे.

मा. महापौर श्री समीर राजुरकर यांच्या संकल्पनेतून महानगरपालिकेच्या पर्यटन विभागाचे वतीने मा.आयुक्त अमोल येडगे यांच्या निर्देशानुसार व उप आयुक्त तथा विभाग प्रमुख अंकुश पांढरे यांच्या मार्गदर्शनाखाली शहरात ऐतिहासिक ठिकाणी हेरिटेज वॉक चे यशस्वी आयोजन करण्यात येत आहे.या उपक्रमास नागरिक, इतिहास प्रेमी आणि विद्यार्थी यांची मोठ्या प्रमाणात साथ लाभत आहे.याच अनुषंगाने दिनांक ३० ऑगस्ट रोजी हेरिटेज वॉकचे आयोजन करण्यात आले आहे.

या हेरिटेज वॉकची सुरुवात नहर-ए-अंबरी गोमुख, ताज हॉटेलसमोर येथून होणार असून सांगता श्री निळकंठेश्वर महादेव मंदिर, वानखेडेनगर येथे होणार आहे. या माध्यमातून महमूदपुरा परिसरातील ऐतिहासिक वास्तू, स्थापत्यशैली, जलव्यवस्था आणि निजामशाहीकालीन वारशाचा जवळून परिचय करून दिला जाणार आहे.

ऐतिहासिक वारशाचा समृद्ध ठेवा महमूदपुरा परिसरातील ऐतिहासिक मकबरा, नहर-ए-अंबरीचा ऐतिहासिक वारसा तसेच श्री निळकंठेश्वर महादेव मंदिरातील राजपूत छत्री शैलीतील बारादरी ही या हेरिटेज वॉकची प्रमुख आकर्षणे आहेत. या वास्तूंच्या माध्यमातून शहराच्या समृद्ध इतिहासातील अनेक महत्त्वपूर्ण पैलू नागरिकांसमोर उलगडले जाणार आहेत.

छत्रपती संभाजीनगर शहराचा ऐतिहासिक वारसा केवळ वास्तूंमध्ये सीमित नसून त्यामागील जलव्यवस्था, स्थापत्यकला, सामाजिक जीवन आणि तत्कालीन नगररचनेची माहितीही या उपक्रमातून नागरिकांना अनुभवता येणार आहे. इतिहासप्रेमी, विद्यार्थी, संशोधक आणि नागरिकांनी आपल्या शहराच्या ऐतिहासिक वारशाची ओळख करून घेण्यासाठी या हेरिटेज वॉकमध्ये मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजक सहायक आयुक्त ऋतुजा पाटील, मार्गदर्शक Intach चे संकेत कुलकर्णी व आदित्य वाघमारे यांनी केले आहे.

# कुंभमेळ्याच्या खर्चावर इम्तियाज जलील यांचा सवाल, राजकीय वतुर्ळात चर्चा

छत्रपती संभाजीनगर, दि. २७ (प्रतिनिधी) - नाशिकमध्ये आगामी कुंभमेळ्याची तयारी युद्धपातळीवर सुरू असून, या अनुषंगाने शहरातील रस्ते, पायाभूत सुविधा आणि इतर विकासकामांना मोठा वेग आला आहे. या भव्य आयोजनासाठी सरकारकडून तब्बल ३० हजार कोटी रुपयांचा भरघोस निधी खर्च केला जाणार असल्याची चर्चा सध्या सुरू आहे. मात्र, कुंभमेळ्याच्या निमित्ताने होणाऱ्या या एवढ्या मोठ्या खर्चावरून आता राजकीय वतुर्ळात विविध चर्चांना उधाण आले असून, विरोधकांकडून यावर प्रश्नचिन्ह देखील उपस्थित केले जात आहे.

एमआयएमचे नेते आणि माजी खासदार इम्तियाज जलील यांनी या भरमसाठ खर्चावर थेट आक्षेप घेत सरकारला लक्ष केले आहे. कुंभमेळ्यावर ३० हजार कोटी रुपये खर्च करण्याऐवजी, या प्रचंड निधीतून आरोग्य आणि शिक्षणासारख्या मूलभूत सुविधा उभारता आल्या असत्या. एवढ्या पैशांतून किती शाळा किंवा आयआयटी उभारता आल्या असत्या? असा परखड सवाल त्यांनी उपस्थित केला आहे.

नागरिकांना चांगल्या शाळा आणि दर्जेदार शिक्षण उपलब्ध करून देणे ही सरकारची प्राथमिक जबाबदारी असल्याचे सांगत त्यांनी या खर्चावर नाराजी व्यक्त केली आहे.

आगामी कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर नाशिक शहरात प्रशासनाकडून विविध विकासकामांना मोठा वेग आला आहे. या भव्य सोहळ्यासाठी देशभरासह परदेशातूनही मोठ्या संख्येने भाविक आणि पर्यटक नाशिकमध्ये दाखल होणार असल्याने, शहरातील रस्ते, पायाभूत सुविधा आणि इतर आवश्यक कामे युद्धपातळीवर पूर्ण केली जात आहेत. या संपूर्ण नियोजनाची आणि आयोजनाची जबाबदारी योग्य रीतीने पार पाडण्यासाठी राज्य शासनाकडून गिरीश महाजन यांची 'कुंभमेळा मंत्री' म्हणून विशेष नियुक्ती करण्यात आली आहे.

# पिंपळे सौदागर येथील 'त्या' प्रलंबित रस्त्याचे काम मार्गी रहिवाशांना अखेर दिलासा




पुणे, दि. २७ (प्रतिनिधी) - पिंपळे सौदागर येथील गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित आणि वादग्रस्त ठरलेल्या झुलेलाल टॉवर ते नॅचरल आईस्क्रीम पर्यंतच्या रस्त्याचे काम गेल्या आठवड्यात मार्गी लागले असून पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्यावतीने त्यासंदर्भात प्रत्यक्ष कार्यवाही सुरु करण्यात आली आहे. नुकतेच मनपातर्फे सदरील रस्त्याची खोदाई सुरु करण्यात आली असल्याने परिसरातील नागरिकांना अखेर दिलासा मिळाला आहे.

सदरील रस्त्यामुळे ज्या गैरसोयींना तोंड द्यावे लागत होते त्याबाबत परिसरातील रहिवाशांनी पिंपरी चिंचवड भाजपाचे शहराध्यक्ष तथा नगरसेवक शत्रुघ्न बापू काटे तसेच भाजपा नगरसेविका डॉ. कुंदाताई भिसे आणि नगरसेविका अनिता काटे यांच्याकडे तीव्र स्वरुपात नाराजी व्यक्त करुन आंदोलन केले होते. रहिवाशांचा एकंदर रोष लक्षात घेता रस्त्याच्या कामाबाबत त्यांना आश्वस्त करण्यात आले होते. त्यानुसार या तीनही नगरसेवकांनी मनपाकडे पाठपुरावा करुन सदरील रस्त्याचे काम मार्गी लावले आहे. झुलेलाल टॉवर ते नॅचरल आईस्क्रीमच्या दुकानापर्यंत पाचशे ते सहाशे मीटरचा हा रस्ता असून त्यापैकी अठरा मीटर रुंद आणि एकशे वीस मीटर लांबीचा रस्ता महानगरपालिका पूर्ण करणार असून उर्वरित रस्त्याचे काम बिल्डर मार्फत केले जाणार आहे.

# राणाबालीच्या रिलीज डेटची घोषणा: दसऱ्याच्या खास मुहूर्तावर १६ ऑक्टोबर २०२६ रोजी प्रदर्शित होणार विजय देवरकोंडा-रश्मिका मंदाना यांचा भव्य पीरियड ड्रामा

'राणाबाली' हा २०२६ मधील सर्वाधिक प्रतीक्षित चित्रपटांपैकी एक बनला आहे. या चित्रपटात चाहत्यांचे लाडके कलाकार विजय देवरकोंडा आणि रश्मिका मंदाना पुन्हा एकदा एकत्र दिसणार आहेत. मायथ्री मूव्ही मेकर्सच्या बॅनरखाली बनत असलेला हा चित्रपट एका भव्य ऐतिहासिक कथेवर आधारित आहे. चित्रपटाचा फर्स्ट लूक, पात्रांची झलक आणि संगीताबाबत समोर आलेल्या प्रत्येक अपडेटने चाहत्यांची उत्सुकता अधिकच वाढवली आहे. प्रसिद्ध दिग्दर्शक राहुल सांकृत्यायन यांच्या दिग्दर्शनाखाली बनत असलेला 'राणाबाली' एक भव्य सिनेमॅटिक अनुभव देण्याचे आश्वासन देतो.




आता या बहुप्रतीक्षित पीरियड सागाच्या रिलीज डेटचीही घोषणा करण्यात आली आहे. विजय देवरकोंडाच्या या बिग-बजेट चित्रपटाच्या निर्मात्यांनी नव्या पोस्टरसह त्याच्या जागतिक थिएट्रिकल रिलीज डेटची घोषणा केली आहे. 'राणाबाली' १६ ऑक्टोबर २०२६ रोजी जगभरातील चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होणार आहे.

दसऱ्याच्या शुभ मुहूर्ताच्या आसपास प्रदर्शित होणाऱ्या 'राणाबाली'ची कथा देखील चांगल्याचा वाईटावर विजय या भावनेला अधोरेखित करणारी आहे. त्यामुळे निर्मात्यांनी चित्रपटाच्या प्रदर्शनासाठी दसऱ्याचा हा खास आणि शुभ मुहूर्त निवडून योग्य वेळ साधला आहे. चित्रपटाचा दमदार आणि इंटेन्स बॅकड्रॉप चांगल्या आणि वाईटाच्या या संघर्षाला आणखी खास बनवतो, त्यामुळे 'राणाबाली'चा हा रिलीज मुहूर्त प्रेक्षकांसाठीही अत्यंत खास ठरणार आहे.

निर्मात्यांनी सोशल मीडियावर चित्रपटाचा नवा पोस्टर शेअर केला आहे, ज्यामध्ये विजय देवरकोंडाचा इंटेन्स आणि रॉ पीरियड लूक पाहायला मिळत आहे. पोस्टरसह टीमने लिहिले आहे, आपल्या इतिहासातील सर्वात काळोखा अध्याय या ऑक्टोबरमध्ये उलगडेल. Ranabaali 16.10.26 रोजी जगभरात भव्य प्रदर्शनासाठी सज्ज.

राहुल सांकृत्यायन यांच्या दिग्दर्शनाखाली बनलेला 'राणाबाली' प्रेक्षकांना एका दमदार आणि रोमांचक कथेसह भूतकाळातील एका वेगळ्या काळात घेऊन जाणार आहे. नव्या पोस्टरमध्ये चित्रपटाची झलक अत्यंत इंटेन्स दिसत आहे. आग आणि धुराने भरलेल्या वातावरणात विजय देवरकोंडा एका रफ आणि धोकादायक अवतारात दिसत आहेत. त्यांच्या हातात एक जड आणि वक्राकार शस्त्रही दिसत आहे. मोठा स्केल, शानदार व्हिज्युअल्स आणि अजय-अतुल यांच्या संगीताने सजलेला 'राणाबाली' हा २०२६ च्या अखेरीस प्रदर्शित होणाऱ्या मोठ्या चित्रपटांपैकी एक ठरण्यासाठी सज्ज आहे. चित्रपटाचे दिग्दर्शन राहुल सांकृत्यायन यांनी केले असून, मायथ्री मूव्ही मेकर्सचे वाय. रविशंकर आणि नवीन येरनेनी यांनी टी-सीरिजच्या सहकार्याने चित्रपटाची निर्मिती केली आहे.

चित्रपटात विजय देवरकोंडासोबत रश्मिका मंदाना मुख्य अभिनेत्रीच्या भूमिकेत दिसणार आहेत. ही लोकप्रिय जोडी पुन्हा एकदा मोठ्या पडद्यावर एकत्र दिसणार असल्याने चाहत्यांमध्येही मोठी उत्सुकता आहे. तसेच, आंतरराष्ट्रीय अभिनेता अर्नोल्ड वॉस्लूही चित्रपटात महत्त्वाच्या भूमिकेत दिसणार असून, त्यामुळे चित्रपटाचे ग्लोबल अपील आणखी वाढले आहे. 'राणाबाली' १६ ऑक्टोबर २०२६ रोजी चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होणार आहे.

सोमवार खेरीज दररोज प्रसिद्ध होणारे दैनिक

लोकविजय

(आरएनआय रजि. नं. ११४२१/६१)

हे पत्रक मुद्रक, प्रकाशक श्री. राजेंद्र पांडुरंग रांजणीकर यांनी सोलापूर तरूणभारत मिडिया लिमिटेड, रेल्वेस्टेशन एमआयडीसी स्टेशनरोड औरंगाबाद येथे छापून दैनिक लोकविजय कार्यालय, ३, चेतनानगर, (माणिक आर्केडच्या पाठीमागे,) औरंगाबाद येथे प्रसिद्ध केले.

: संपादक :

राजेंद्र पांडुरंग रांजणीकर

मो. :९३२५२११९०१, ९५१८७६६३९५

e-mail:lokvijay2000@yahoo.co.in

या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, फीचर, लेख, कथा यांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

बातम्या व इतर मजकूराबद्दल काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधीत वार्ताहार, प्रतिनिधी, उपसंपादक, वृत्तसंपादक, यांची राहील. संपादक, मालक, पूकाशक, मुद्रक त्याला जबाबदार राहणार नाहीत. (औरंगाबाद न्यायकक्षेत)

# स्वच्छ, सुंदर ‘वेरूळ’साठी सरसावले प्रशासन

छत्रपती संभाजीनगर दि.२७ (प्रतिनिधी)- वेरूळ येथे प्रशासनाच्या वतीने श्रावण महिन्यानिमित्त आज स्वच्छता अभियान राबविण्यात आले. जिल्हाप्रशासनातले सर्व वरिष्ठ अधिकारी, पदाधिकारी यांच्यासह सर्व प्रशासन वेरुळ स्वच्छ, सुंदर करण्यासाठी सरसावले. श्रमदानातून अवघ्या तीन तासात वेरुळ स्वच्छ करण्यात आले.

वेरुळ नगरपरिषदेने याकामी पुढाकार घेतला. नगरपालिका प्रशासनाच्या वतीने हे स्वच्छता अभियान राबविण्यात आले. या अभियानास जिल्हा परिषद अध्यक्ष अविनाश गलांडे, आ. प्रशांत बंब, छत्रपती संभाजीनगरचे महापौर समीर राजूरकर, छत्रपती संभाजीनगर विभागाचे विभागीय आयुक्त जी. श्रीकांत, जिल्हाधिकारी विनय गौडा, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती मिन्नू,जिल्हा परिषद सदस्य कृणाल दांडगे, पं.स. सदस्य दिनेश अंभोरे, वेरुळ सरपंच कुसुमबाई प्रकाश मिसाळ, पोलीस अधीक्षक प्रकाश जाधव तसेच अपर जिल्हाधिकारी संभाजीराव अडकुणे, न.पा. प्रशासन अधिकारी सौरभ जोशी तसेच सर्व विभागप्रमुख यांच्यासह सर्व शासकीय अधिकारी-कर्मचारी सहभागी झाले होते.

वेरूळ हे जागतिक पर्यटन व धार्मिक महत्त्व असलेले ठिकाण असून, येथे येणाऱ्या पर्यटक व भाविकांना स्वच्छ, सुंदर आणि निरोगी वातावरण मिळावे, यासाठी प्रशासनाचा हा महत्त्वपूर्ण उपक्रम आहे. श्रावण महिन्यात भाविक पर्यटकांची संख्या जास्त असल्याने वेळच्या वेळी स्वच्छता राबवून निरोगी वातावरण निर्माण करण्यासाठी प्रशासनाचा हा उपक्रम असल्याचे जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी सांगितले.

**वेरूळ येथील विकासकामांची पाहणी**

वेरूळ येथील श्री घृष्णेश्वर मंदिर परिसरात भक्ती निवास, नवीन दुकाने तसेच नवीन मार्गाच्या कामांची पाहणी करण्यात आली. विभागीय आयुक्त जी. श्रीकांत, जिल्हाधिकारी विनय गौडा आणि जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती मिन्नू पी.एम. यांच्यासह संबंधित विभागाचे अधिकारी यावेळी उपस्थित होते. स्थानिक रहिवासी व दुकानदार यांच्याशीही यावेळी चर्चा करण्यात आली. या




पाहणीदरम्यान परिसरातील विकासकामांचा आढावा घेऊन भाविक व पर्यटकांना आवश्यक सुविधा उपलब्ध करण्याबाबत चर्चा करण्यात आली.

**आरोग्य विभागाचा सहभाग**

या अभियानात आरोग्य विभागाने सक्रीय सहभाग घेतला. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अभय धानोरकर यांच्या मार्गदर्शनाखाली आरोग्य विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी या अभियानात उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. तालुका आरोग्य अधिकारी डॉ. समाधान राऊत, डॉ. रंगनाथ तुपे, वैद्यकीय अधिकारी डॉ. आफताब शेख, डॉ. अविनाश बेरे, जिल्हास्तरीय अधिकारी व कर्मचारी यांच्यासह तालुकास्तर व प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावरील समुदाय आरोग्य अधिकारी, आरोग्य कर्मचारी आणि आशा स्वयंसेविका मोठ्या संख्येने सहभागी झाले.

**‘माझं गाव, आरोग्य संपन्न गाव’चा संदेश**

यावेळी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अभय धानोरकर यांनी ‘माझं गाव, आरोग्य संपन्न गाव’ या अभियानाचे आरोग्याच्या दृष्टीने असलेले महत्त्व उपस्थित अधिकारी, कर्मचारी व ग्रामस्थांना समजावून सांगितले. निरोगी आरोग्य जीवनासाठी स्वच्छ परिसर, वैयक्तिक स्वच्छता, सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता आणि कचऱ्याचे योग्य विलगीकरण यांचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले.

### अभियानाची वैशिष्ट्ये

* स्वच्छता मोहिमेसाठी एकूण सुमारे ४० कचरा संकलन वाहने कार्यरत होती.
* यापैकी १० मोठी वाहने आणि १०० कर्मचारी छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेमार्फत उपलब्ध करून देण्यात आले होते.
* अभियानात स्वच्छता कर्मचाऱ्यांसोबत साधारणतः ४०० अधिकारी व कर्मचारी यांनी सहभाग नोंदविला.
* अभियानादरम्यान परिसरातून अंदाजे ५० टन कचऱ्याचे संकलन करण्यात आले.
* वेरूळ लेणी परिसर, अरिहंत चौक, घृष्णेश्वर मंदिर परिसर, मालोजी राजे भोसले गढी परिसर व भोसले चौक परिसर या मुख्य ठिकाणी स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.

*श्रीक्षेत्र घृष्णेश्वर ज्योतिर्लिंग विकास आराखडा*

# पुरातत्व विभागाच्या सूचनांनुसार विकास कामे करा-बी. वेणूगोपाल रेड्डी



छत्रपती संभाजीनगर दि.२७ (प्रतिनिधी)- श्रीक्षेत्र घृष्णेश्वर ज्योतिर्लिंग विकास आराखड्यानुसार विकास कामे करतांना पुरातत्व विभागाने केलेल्या सूचनांनुसार करावी. तसेच स्थानिक राहिवासी, दुकानदार आणि यात्रेकरू अशा सर्व घटकांना सर्वसमावेशक ठरेल अशी अंमलबजावणी करावी, असे निर्देश अपर मुख्य सचिव बी. वेणूगोपाल रेड्डी यांनी आज येथे दिले.

श्रीक्षेत्र घृष्णेश्वर ज्योतिर्लिंग विकास आराखडा अंमलबजावणी संदर्भात आज आढावा घेण्यात आला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या व्यवस्थापन समिती सभागृहात घेण्यात आला.

मुख्य निवडणूक अधिकारी पी. चोकलिंगम, जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी., पुरातत्व विभागाचे सह संचालक अनिल तिवारी, उपसंचालक सुब्रह्मण्यम, पोलीस अधीक्षक प्रकाश जाधव, उपविभागीय पोलीस अधिकारी अपराजिता अग्निहोत्री,जिल्हा नियोजन अधिकारी ममता हटकर, उपविभागीय अधिकारी संतोष गोरड, अधीक्षक अभियंता एस. एस. भगत, कार्यकारी अभियंता स्मिता पवार, जिल्हा सह आयुक्त न. प. प्रशासन सौरभ जोशी तसेच वन विभाग आदी अधिकारी उपस्थित होते.

बैठकीत माहिती देण्यात आली की, आराखड्याप्रमाणे सुरु असलेल्या कामातील भक्तनिवास, शॉपिंग सेंटर, भक्त मार्गिका, दर्शन बारी, पार्किंग, दर्शन बारी साठी अंडर पास इ. कामे गतीने सुरु आहेत. त्यातील काही कामे ऑक्टोबर पर्यंत पूर्ण होतील. अंडर पास साठीचे सीमांकन पुरातत्त्व विभागाकडून करून देण्यात आले आहे.

श्री. रेड्डी यांनी निर्देश दिले की, निर्माण होत असलेल्या सुविधा ह्या सर्वसमावेशक असाव्या. मंदिर परिसरातील दुकानदार, स्थानिक राहिवासी यांना सुविधा जनक वाटावे असे नियोजन असावे. येणारे यात्रेकरू जे भक्त असतील किंवा पर्यटक या सगळ्यांना सुकर वाटावी, अशी सुविधा निर्मिती व्हावी. परिसरातील महादेव वन, लेणी आणि मंदिर परिसराला जोडणाऱ्या ह्या सुविधा असाव्यात. जेणेकरून येणारे पर्यटक सर्व भागांना भेटी देऊ शकतील.

जिल्हाधिकारी गौडा यांनी सांगितले की, या विकास आराखड्याची अंमल बजावणी करतांना पुरातत्व विभागाने केलेल्या सूचनांचा पूर्ण अंतर्भाव करण्यात येईल. तसेच सर्व घटकांना सामावून घेण्यात येईल. तसेच बफर झोन मध्ये संबंधित विभागाच्या अभिप्रायानंतर निर्णय घेण्यात येईल. तसेच घन कचरा व्यवस्थापन संदर्भात उपाययोजना अंमलबजावणीबाबत प्रयत्न सुरु आहेत, असेही त्यांनी सांगितले.

# एसआयआरच्या पुढील टप्प्यातील प्रक्रिया सुलभ, पारदर्शक व सर्वसमावेशक ठेवा-मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम

### पुढील टप्प्यातील कामांसाठी विभागाची यंत्रणा सज्ज!



छत्रपती संभाजीनगर दि.२७ (प्रतिनिधी)- विशेष सखोल पुनरीक्षणाच्या पुढील टप्प्यात प्रारूप मतदार यादीच्या अनुषंगाने प्राप्त होणाऱ्या अर्ज, सूचना व हरकतींवर तत्परतेने कार्यवाही करण्यासाठी सक्षम यंत्रणा सज्ज ठेवावी. मतदार यादीतील नोंदींची पडताळणी, नमुना क्रमांक ६, ७ व ८ मधील अर्जांवर कार्यवाही आणि आवश्यक दुरुस्त्या नियमानुसार पूर्ण करताना प्रक्रिया सुलभ, पारदर्शक व नागरिकाभिमुख ठेवावी, असे निर्देश मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम यांनी दिले.

छत्रपती संभाजीनगर विभागातील विशेष सखोल पुनरीक्षणाच्या कामाचा श्री. चोक्कलिंगम यांनी स्मार्ट सिटी कार्यालयात आढावा घेतला. त्यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी विभागीय आयुक्त जी. श्रीकांत, छत्रपती संभाजीनगर जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी., जालना जिल्हाधिकारी आशिमा मित्तल, बीड जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, नांदेड जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, परभणी जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण, लातूर जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड, सहआयुक्त मंजुषा मिसकर यांच्यासह संबंधित आठही जिल्ह्यांतील उपजिल्हा निवडणूक अधिकारी, निवडणूक नोंदणी अधिकारी, सहाय्यक निवडणूक नोंदणी अधिकारी तसेच संबंधित अधिकारी उपस्थित होते.

श्री. चोक्कलिंगम म्हणाले, विशेष सखोल पुनरीक्षणाच्या कामाला गती देण्यासाठी मतदार यादीची पाने आणि नोटिसांची छपाई नियोजनबद्ध पद्धतीने वेळेत पूर्ण करावी. यासाठी जिल्हानिहाय नियोजन करावे, असे निर्देश त्यांनी दिले. यावेळी विभागातील आठही जिल्ह्यांतील छपाईची कामे, उपलब्ध यंत्रसामग्री, संबंधित संस्थांची क्षमता आणि कामाचे नियोजन यांचा त्यांनी आढावा घेतला.

प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध झाल्यानंतर नागरिकांकडून प्राप्त होणाऱ्या सूचना व अर्जांवर तातडीने कार्यवाही करण्यासाठी संबंधित यंत्रणा सक्रिय ठेवावी. एखाद्या नागरिकाचे नाव प्रारूप यादीत आढळून न आल्यास त्याची सध्याची निवासस्थिती तपासून आवश्यकतेनुसार नमुना क्रमांक ६ भरून घेऊन नियमानुसार कार्यवाही करावी. नागरिकांना प्रक्रिया व अर्जांबाबत स्पष्ट आणि सुलभ मार्गदर्शन उपलब्ध करून द्यावे, असे त्यांनी सांगितले.

प्रारूप मतदार यादीबाबत नागरिकांच्या शंका व सूचनांचे निराकरण करण्यासाठी निवडणूक अधिकारी आणि मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांमध्ये समन्वय ठेवावा. मतदार यादीतील नोंदींमध्ये झालेल्या बदलांबाबत नागरिकांना स्पष्ट माहिती द्यावी. तसेच नाव समाविष्ट करणे, आवश्यक दुरुस्ती करणे किंवा नियमानुसार वगळण्याच्या प्रक्रियेबाबत योग्य मार्गदर्शन करावे.

यावेळी एसआयआरच्या पुढील टप्प्यात पात्र मतदारांची नावे मतदार यादीत कायम राहतील तसेच दावे व हरकतींची प्रक्रिया पारदर्शक व नियमानुसार पूर्ण होईल, यासाठी जिल्हानिहाय यंत्रणा सज्ज ठेवावी. प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध झाल्यानंतर नागरिकांनी आपले नाव तपासून आवश्यक असल्यास विहित मुदतीत दावा किंवा हरकत दाखल करावी. तसेच अनमॅप्ड मतदारांच्या प्रकरणांमध्ये निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार कार्यवाही करावी.

नोटीस बजावणे, कागदपत्रांचे संकलन आणि प्राथमिक पडताळणीसाठी स्थानिक परिस्थितीनुसार योग्य पद्धत स्वीकारावी. पात्र मतदारांचे उपलब्ध मोबाईल क्रमांक, फोटो ओळखपत्र तसेच इतर वैध ओळखपत्रांच्या माध्यमातून संपर्क व पडताळणीची प्रक्रिया सुलभ करता येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. याबाबतीत इतर राज्यांमध्ये अवलंबिलेल्या चांगल्या पद्धतींचा अभ्यास करून त्यांचा अवलंब करता येईल, असे त्यांनी सांगितले. नागरिकांचे दावे, हरकती तसेच तक्रारींची तातडीने दखल घेऊन संबंधितांची आवश्यक कागदपत्रे पडताळावीत. पात्र नागरिकांची नावे मतदार यादीत अचूकपणे समाविष्ट करण्याची प्रक्रिया पारदर्शकपणे पूर्ण करावी, अशी सूचना करून प्रत्येक भारतीय नागरिकाचा मतदानाचा हक्क अबाधित राखण्यासाठी निवडणूक आयोग कटिबद्ध असल्याचेही त्यांनी सांगितले.

एसआयआरच्या पहिल्या टप्प्यात निवासी स्थितीची पडताळणी करण्यात आली असून, पुढील टप्प्यात प्रारूप मतदार यादी, दावे-हरकती, सुनावणी आणि त्यावरील पुढील कार्यवाहीचे नियोजन आवश्यक आहे. नागरिकत्व असलेल्या नागरिकांना अनावश्यक त्रास होणार नाही, याची दक्षता घ्यावी, असे निर्देशही त्यांनी दिले.

मतदार नोंदणीची प्रक्रिया अधिक व्यापक करण्यासाठी नव्याने पात्र झालेल्या युवकांच्या नोंदणीसाठी विशेष जनजागृती करावी. महाविद्यालये, कनिष्ठ महाविद्यालये आणि मतदार साक्षरता मंचांच्या माध्यमातून जनजागृती उपक्रम राबवावेत. निवडणूक प्रक्रियेबाबत राजकीय पक्ष, प्रसारमाध्यमे आणि समाजमाध्यमांच्या माध्यमातून नागरिकांना अचूक माहिती उपलब्ध करून द्यावी, असेही त्यांनी सांगितले.

प्रारंभी सहाय्यक आयुक्त श्रीमती मिसकर यांनी छत्रपती संभाजीनगर विभागातील छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, बीड, लातूर, हिंगोली, धाराशिव व नांदेड या सर्व जिल्हाधिकाऱ्यांनी आणि त्यांच्या पथकांनी निर्धारित कालावधीत एसआयआरच्या पहिल्या टप्प्यातील काम पूर्ण केल्याचे सांगितले.

यावेळी विभागातील सर्व जिल्हाधिकाऱ्यांनी आपापल्या जिल्ह्यात राबविण्यात आलेल्या विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमाच्या कामकाजाची माहिती दिली. हाऊस-टू-हाऊस सर्व्हे, एन्यूमरेशन फॉर्मचे वितरण व संकलन, मतदार नोंदींचे मॅपिंग व डिजिटलायझेशन तसेच अनमॅप्ड, अनुपस्थित, स्थलांतरित, मृत आणि दुबार नोंद असलेल्या मतदारांची पडताळणी याबाबत जिल्हानिहाय सद्यस्थिती त्यांनी सादर केली. पुढील टप्प्यातील नियोजनाची माहितीही त्यांनी दिली.

एसआयआरच्या सुधारित वेळापत्रकानुसार ३१ ऑगस्ट २०२६ रोजी प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध होणार आहे. त्यानंतर ३१ ऑगस्ट ते ३० सप्टेंबर २०२६ या कालावधीत नागरिकांना दावे व हरकती दाखल करता येतील. दावे-हरकतींवरील नोटीस बजावण्याची व ते निकाली काढण्याची प्रक्रिया २९ ऑक्टोबरपर्यंत सुरू राहणार असून, ४ नोव्हेंबर २०२६ रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध होणार आहे.

# जिल्हास्तरीय गुंतवणूक परिषद शनिवारी (दि. २९)

छत्रपती संभाजीनगर दि.२७ (प्रतिनिधी)- उद्योग क्षेत्रात गुंतवणूक वाढावी यासाठी गुंतवणूकदार, व्यावसायिक यांना व्यासपीठ उपलब्ध करुन देण्यासाठी जिल्हास्तरीय गुंतवणूक परिषदेचे आयोजन शनिवार दि.२९ रोजी करण्यात आले आहे. ही परिषद शनिवार दि.२९ रोजी सकाळी १० ते दुपारी ४ वा. पर्यंत हॉटेल रामा इंटरनॅशनल येथे होणार आहे.

जिल्हास्तरीय गुंतवणूक परिषद २०२६ च्या अध्यक्षस्थानी राज्याचे सामाजिक न्याय तथा जिल्ह्याचे पालकमंत्री संजय शिरसाट हे राहणार असून विभागीय आयुक्त जी. श्रीकांत, जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी या परिषदेत प्रमुख उपस्थिती असेल.

जिल्ह्यात ऑटोमोबाईल, इंजिनिअरींग उद्योग तसेच कृषी व अन्न प्रक्रिया उद्योग व हिमरु शाल, वस्त्रोद्योग अशा विविध उद्योगांचे महत्त्वाची केंद्र आहेत. स्थानिक उत्पादनांना बाजारपेठ उपलब्ध करुन देणे, निर्यातदारांसाठी सुविधा निर्माण करणे, नवीन उद्योग, गुंतवणूक आकर्षित करणे इ. या परिषदेचे उद्दिष्ट आहेत. त्यादृष्टिने चर्चा, विचार विनिमय, सामंजस्य करार इ. उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

जिल्ह्यातील उद्योजक, उद्योजक संघटनांचे प्रतिनिधी, शेती उत्पादक संस्था, नव उद्योजक यांनी या परिषदेत सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा उद्योग केंद्राच्या उपायुक्त श्रीमती करुणा खरात यांनी केले आहे.

## (पान १ वरुन)

### नेपाळमधील महाप्रलयात ८...

इशारा देतांना म्हटले की, ‘‘हिमालयात बर्फ वितळला किंवा दुर्घटना घडली, तर त्याचा थेट परिणाम समुद्राची पातळी वाढण्यावर होतो. त्यामुळे भारत आणि नेपाळ या दोन्ही देशांसमोर हिमालयातील ढासळत्या पर्यावरणाचा एक अत्यंत गंभीर आणि सामायिक धोका निर्माण झाला आहे,’’ भारत, चीन, नेपाळ आणि भूतान हे सर्व देश पर्यावरणाच्या साखळीने एकमेकांशी जोडलेले असून, राजकीय मतभेद बाजूला ठेवून या देशांनी हिमालयाच्या रक्षणासाठी एकत्र काम करण्याची गरज असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. या संदर्भातील वृत्तसंस्थेने वृत्त दिले आहे.

‘‘भारत आणि नेपाळ यांच्यातील ऐतिहासिक संबंधांवर बोलताना आपण नेहमीच ‘रोटी-बेटी’ आणि ‘सीता-राम’ यांच्यातील सांस्कृतिक व धार्मिक आधाराचा उल्लेख करतो. संस्कृती आणि धर्माचे आपल्या संबंधांमध्ये मोलाचे स्थान आहेच, परंतु आता काळ बदलला असून आपल्याला आपल्या संबंधांची पुनर्रचना ‘पर्यावरणीय दृष्टिकोनातून’ करण्याची अत्यंत गरज आहे,’’ असे प्रतिपादन शिशिर खनाल यांनी केले.

### सीमांकन विधेयकासाठी संसदेचे...

जावा अशी मागणी त्यांनी केली आहे.

खरगे यांनी १६ जुलै २०२६ रोजी लिहिलेल्या त्यांच्या मागच्या पत्राचा हवाला या पत्रात दिला आहे. ज्यात त्यांनी सर्वपक्षीय बैठक बोलावण्याची मागणी केली होती. केंद्रीय संसदीय कार्यमंत्री यांनी अलीकडेच एक मुलाखत दिली. ज्यात त्यांनी सीमांकनाशी संबंधित नवीन विधेयक सादर करण्यासाठी सरकार संसदेचे विशेष अधिवेशन बोलावण्याचा विचार करत आहे असं म्हटलं. संसदेचे पावसाळी अधिवेशन वारंवार लांबणीवर पडण्याचे हेच संभाव्य कारण आहे असा संशय खरगेंनी वर्तवला.

### ओबीसी प्रमाणपत्रावरुन आधी...

मीडिया हँडलवरुन केलेल्या पोस्टमध्ये वडेट्टीवारांनी निराधार वक्तव्याप्रकरणी माफी मागण्याची मागणी केली. ‘‘माझ्याकडे ओबीसी प्रमाणपत्र असल्याचा त्यांचा दावा असेल, तर त्यांनी त्यासंदर्भातील पुरावा जाहीरपणे सादर करावा आणि ते सिद्ध करावे. अन्यथा कोणत्याही पुराव्याशिवाय केलेल्या या आरोपाबद्दल त्यांनी जाहीर माफी मागावी’’, अशी मागणी सुळेंनी केली.

याप्रकरणी वडेट्टीवारांनी सुप्रिया सुळे यांच्या नावाचा उल्लेख अनावधानाने झाल्याचे स्पष्ट केले आहे. ओबीसी प्रमाणपत्राच्या संदर्भात माझी भूमिका मांडताना खासदार सुप्रिया सुळे यांच्या नावाचा अनावधानाने उल्लेख झाला. त्यामागे त्यांच्यावर कोणताही आरोप करण्याचा माझा हेतू नव्हता. अनावधानाने त्यांच्या नावाचा उल्लेख झाल्याबद्दल खेद व्यक्त करतो, असे वडेट्टीवारांनी ‘एक्स’ या सोशल मीडिया हँडलवर केलेल्या पोस्टमध्ये म्हटले आहे.

### अमित साटमांना भुंकायला...

ना जो लोकांच्या मृत्यूवर हसला. लोकांवर झाड पडून, खड्ड्यात पडून मृत्यू झाले त्यावर तो हसला,तो माणूस ठरवणार का माझा मुलगा कुठल्या शाळेत जायला पाहिजे?‘‘.

यावेळी अमित ठाकरेंच्या उपस्थितीत मनसे सभासद नोंदणी झाली. मी सगळीकडे सभासद नोंदणी करतोय, मुंबई, कल्याण, डोंबिवली, नाशिक झाले आहे. आज नागपूरला आलोय. कॉलेज पातळीवर काय अडचणी, समस्या आहेत ते जाणून घेतोय, आमच्यावेळी परिस्थिती नव्हती,आज संघटना विद्यार्थ्यांच्या पाठीशी उभी आहे,कधी काही लागले तर आम्ही तुमच्या मागे उभे आहोत, असं अमित ठाकरे म्हणाले.

### खुन्नस द्याल तर मुंबईला...

सांगितले की, ’माझ्या एका हाकेवर राज्यभरातून तब्बल ४० ते ४५ लाख वाहने मुंबईच्या दिशेने निघतील. हे आंदोलन आम्ही ५ वेगवेगळ्या टप्प्यांत करणार असून, अखेरच्या टप्प्यात ६ कोटी मराठा बांधव मुंबईत दाखल होतील. अशी खुन्नस देऊन जर सरकार आम्हाला अडवणार असेल, तर आम्ही मुंबईत जाऊनच दाखवू. कोणात किती दम आहे आणि कोण काय वाकडे करते, हे आम्ही पाहूच.’

### सोन्याच्या दरात पुन्हा मोठी तेजी

दरम्यान, देशांतर्गत बाजारात, एमसीएक्स (मल्टी कमोडिटी एक्सचेंज) सोन्याचे ऑक्टोबर फ्युचर्स ०.२८ टक्क्यांनी वाढून प्रति १० ग्रॅम १,६०,१०८ रुपयांवरवर पोहोचले.

बुधवारी जाहीर झालेल्या आकडेवारीवरून असे दिसून आले की, जुलै महिन्यात अमेरिकेतील वार्षिक महागाई दर स्थिर राहिला आणि तो फेडरल रिझर्व्हच्या २ टक्क्यांच्या उद्दिष्टापेक्षा बऱ्याच वरच्या पातळीवर कायम आहे. अलीकडील उच्चांकावरून महागाई दरात होणारी घट अनपेक्षितपणे थांबल्यामुळे, व्याजदर वाढवावेत की ते जैसे-थे ठेवावेत, यावर फेडरल रिझर्व्हमध्ये पुन्हा चर्चा सुरू होण्याची शक्यता आहे.

दैनिक लोकविजय **CHANGE OF NAME**

I HAVE CHANGING MY NAME FROM
**OLD NAME -** SWAPNA NIKHIL PATHAK
TO
**NEW NAME -** SWAPNALI NIKHIL PATHAK
AS PER DOCUMENT
**ADDRESS -** 52, SAHAKAR NAGAR NEW OSMANPURA, AURANGABAD 431001 MAHARASHTRA

## नगर परिषद वैजापूर, जि. छत्रपतीसंभाजीनगर

वैजापूर तहसील कार्यालयाजवळ, स्टेशन रोड, वैजापूर,
ता. वैजापूर जि. छत्रपती संभाजीनगर पिन कोड : ४२३७०१
दूरध्वनी क्रमांक: ०२४३६-२९५०३६ ई-मेल: npvaijapur@gmail.com

जा.क्र./नपवै/कावी/बांध/२०२६/९४७ दि. २७/०८/२०२६

### निविदा सूचना

वैजापूर नगर परिषद वैजापूर हे महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाची खालील दर्शविलेल्या कामासाठी अनुभवी योग्य त्या वर्गातील नोदणीकृत गुत्तेदाराकडून/एजन्सी धारकाकडून निविदा मागवीत आहे. कोरे निविदा फॉर्म सुटीचे दिवस वगळून दि. ०४/०९/२०२६ पर्यंत कामाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत खालील प्रमाणे निश्चित किंमत जमा केल्यानंतर नगर परिषद कार्यालयात बांधकाम विभागात विकत मिळतील.

१) गुत्तेदाराने मोहोरबंध निविदा दोन लिफाफा पद्धतीत मुख्याधिकारी, नगर परिषद वैजापूर यांच्याकडे दि. ०७/०९/२०२६ रोजी दुपारी ४.०० वाजे पर्यंत सादर कराव्यात. २) निविदा सोबत बयाना रक्कम रोख जमा करणे आवश्यक आहे. ३) जमा केलेल्या बायाना रकमेचा पावती क्रमांक सिलबंद पाकिटावर नमूद करावा. ४) बयाना रक्कमे शिवाय निविदा स्विकारली जाणार नाही. ५) प्राप्त झालेल्या निविदा शक्य झाल्यास त्याच दिवशी ठीक ५.०० वा. मा. मुख्याधिकारी यांच्या दालनात उपस्थिता समक्ष उघडण्यात येतिल. ६) मान्य निविदा धारकाच्या बिलातून अनामत, आयकर, GST, कामगार उपकर, रॉयलटी इत्यादीची नियमानुसार कपात करण्यात येईल. ७) इतर अटी व शर्ती कार्यालयीन वेळेत सुटीचे दिवस वगळून न.प. बांधकाम विभागात विनामूल्य पहावयास मिळतील. ८) खालील कामासाठी (Price Escal Action) Clause लागू राहणार नाही. ९) भारत सरकार राजपत्र दि. ०८/०१/२०२१ नुसार EPF रेजिस्ट्रेशन बंधनकारक राहील. ॥) कोणतीही निविदा कारण न दर्शविता नाकारण्याचा अधिकार न.प. ने राखून ठेवला आहे.

**कामाचा तपशील खालील प्रमाणे.**

| अ.क्र | कामाचे नाव | अंदाजपत्रक रक्कम | बयाना रक्कम | टेंडर फोर्म फी | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|---|
| १ | मौजे वैजापूर ता. वैजापूर येथेशिवरत्न जिवाजी महाले पुतळा परिसर विकसित करणे. | ८०४८७६ | १६०९८ | १००० | ६ महिने |

| स्वाक्षरीत | स्वाक्षरीत | स्वाक्षरीत | स्वाक्षरीत |
|---|---|---|---|
| (ए.एम. सोनवणे) | (ए.बी.सोनवणे ) | (बि.यु.बिघोत (राजपूत) ) | (दिनेश पी. परदेशी) |
| कनिष्ठ अभियंता | नगर अभियंता | मुख्याधिकारी | नगराध्यक्ष |
| नगर परिषद वैजापूर | नगर परिषद वैजापूर | नगर परिषद वैजापूर | नगर परिषद वैजापूर |